करून धार्मिक बाबतींतील समाजांतील विषमता व अन्याय दूर करणें. हे दोन्ही संकल्प त्यांनी परिपूर्ण केले. श्री. ज्ञानेश्वरांचा ग्रंथ रचनेचा सर्वच थाट अगदींच अभिनव. श्री शंकराचार्य, श्री रामानुज आणि वामन पंडीत ह्यांच्या गीतेवरील टीकेंतील मंगलाचरण वाचल्याबरोबर आतां पुढें लेखक कोणत्या वळणावर जाणार ह्याची अटकळ करतां येतें. ज्ञानेश्वरीचें मंगलाचरण पाहिलें तर आत्मरूप श्री गणेशाचे वाङ्मयीम रूपक आणि तें संपताक्षणींच " आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थ कला कामिनी । ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥ अशी शारदेची प्रार्थना. ज्ञानेश्वरींतील आध्यात्मिक प्रमेयांची विवरणें अगदीं सरळ. कुणाशीही वाद नाहीं. कर्णकटू अशा घटपटादि खटपटीचा मुळींच गलबला नाहीं. मधून मधून " माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । अमृतातें हीं पैजा जिंकें ।", " देशियेचेनि नागरपणें । शांतु शृंगारातें जिणें । तरी वोविया होती लेणें ।, साहित्यासी ", " तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं । शोभती आयणी । चोखट आईका ॥ ", " उठावलिया भावारूप । करितां रसवृत्तीचें लागे वडप । चातुर्य म्हणे पडप । जोडलें आम्हां ॥ ", " तैसे देशियेचें लावण्य । हिरोनि आणिलें तारुण्य । मग रचिलें अगण्य ॥ गीतातत्व ॥ " ह्या भाषाभिमानाच्या लाटा आध्यात्मिक विवरणाचे बांधारें उल्लंघून उसळून वर येतच आहेत.

ज्ञानेश्वरींतील ह्या अनन्य साहित्य सौंदर्यामुळेंच 'नटकृत तांडव विकटा पंडित टीका स्फुरंति गीतायां रंभालास्य विलासा जयति ज्ञानेश्वरी तासु' असा अभिप्राय रसिकांनीं धन्यपणें दिला आहे.

कोणताहि आणि कितीहि प्रतिभासंपन्न लेखक असला तरी त्याच्या स्फूर्तीला कांहीं-तरी सीमा ही असतेच. कितीहि उत्कृष्ट ग्रंथ घेतला तरी त्या ग्रंथाच्या शेवटीं लेखकाची स्फूर्ति ओसरत चालली आहे याचा अनुभव रसिकांना येतोच. परंतु श्री ज्ञानेश्वरीच्या बाबतींत मात्र सर्व कांहीं निराळाच थाट दिसतो. अठराव्या अध्यायांतील टीका पूर्ण होऊन गुरुजन आणि संतांचे आभार मानल्यानंतर वास्तविक पाहिलें तर ज्ञानेश्वरीचें लेखन पूर्ण व्हावयास पाहिजे होतें. परंतु ज्ञानेश्वरींतील स्फूर्तीचा अमोघ प्रवाह चालूच आहे. त्या स्फूर्तीला उसंतच नाहीं. श्री ज्ञानेश्वरांसमोर बसलेले सर्व संत आतां ज्ञानेश्वरांचें प्रवचन संपलें म्हणून उठण्याचा विचार करीत आहेत तोंच ज्ञानेश्वरांनी पसायदानाला प्रारंभ केला. " चहूं पुरुषार्थां शिरी । भक्ति जैसी " ह्या ज्ञानेश्वरींतील भक्तीच्या महतीनें सारे श्रोते, संत व भक्त तल्लीन आणि तन्मय झाले होते. ज्ञानेश्वरांनी पसायदान सुरूं केलें. भक्त विस्मयानें आणि कौतुकानें तटस्थपणें ऐकत राहिले. ते मंत्रमुग्ध झालें ह्यांत नवल कसलें ! ज्ञानेश्वरींतील प्रतिभा, प्रसाद, लालित्यादि गुणांनीं अगदी अखेरपर्यंत उचंबळून वहाणारी स्फूर्ती ह्याला जागतिक वाङ्मयांत जोड नाहीं. ज्ञानेश्वरींतील पसायदानांत भक्तीचें रहस्य सांठवलेलें आहे. हें पसायदान म्हणजे भक्तीचें शिखर. बोलून चालून श्री ज्ञानेश्वर म्हणजे शब्दसृष्टीचे

राजराजेश्वर. ज्ञानेश्वरींतील ४ थ्या अध्यायाच्या समारोपांत सांगितल्या प्रमाणें " हे परिसा मऱ्हाटे बोल। जे समुद्राहुनि सखोल अर्थ भरित ।। जैसें बिंब जरी बचकेचि एवढें। परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें । शब्दाचीं व्याप्ति तेणें पाडे। अनुभवावी " असें ज्यानें मराठी भाषेवर प्रभुत्व त्या श्री ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील पसायदानांतील उदात्तता, प्रतिभासंपन्नता आणि माधुर्यता अवीट आहे. छे, श्री ज्ञानेश्वरांच्या शब्दांत बोलायचें म्हणजे त्या पसायदानाची रुचि व महती नित्य नवी अशीच आहे.

आज सर्व संतपूजन, कीर्तन, भजनादि कार्यास वाहून घेतलेल्या सर्व धार्मिक संस्थाना त्या पसायदानांत एक एक पवित्र असा संदेश दिलेला आहे ह्यांत संशय नाहीं. केवळ स्वतःच्या उद्धारासाठीं धडपडणारी भक्ति ही कनिष्ठ भक्ति होय. हें भक्तिचें वैयक्तिक आकुंचित क्षेत्र होय. पण ज्या भक्तीला भक्त मोठ्या अभिमानानें पंचम पुरुषार्थ म्हणून मानतात अशा भक्तांची तळमळ अहोरात्र सबंध विश्वाच्या उद्धारासाठीं प्रयत्न करीत असते. ही भक्ति म्हणजे प्रचंड शक्ति; ही निर्व्याज प्रेमाची प्रशांत देवता आहे. नारदीय भक्ति सूत्रांत 'कस्तरति कस्तरति माम्' ह्याचें उत्तर 'यो महानुभावं सेवते' असें म्हटलें आहे. हे महानुभावी कोण आणि त्यांचा महानुभाव कोणता हें पसायदानाच्या "चला कल्पतरूंचे अरव। चेतना चिंतामणीचे गांव" ह्या शब्दप्रबंधांत समर्पकपणें सांगितलें आहे. खुद्द नारद महर्षिंही म्हणतात कीं " स तरति स तरति स लोकांस्तारयति " असे भक्त स्वतः तरतात यांत काय नवल परंतु सर्व लोकांचें तारण करतात; अशा महानुभाव भक्तांची जगाला आज अत्यंत जरूरी आहे. विसंवादी तत्वप्रणालीच्या संघर्षानें आज सर्व जगाचा संहार होऊं पहात आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं धार्मिक संस्थांनी आपल्या नित्य वहिवाटीच्या भजन कीर्तनादि प्रकारांना नवें वळण देणें जरूर आहे. व्यष्टि समष्टीच्या दैनंदीन चिंता दूर करून 'माझेनि नामघोषें। नाहींचि करिती विश्वाची दुःखें' अशा उदात्त अंतःकरणानें आपल्या भजन कीर्तनांत विश्व—शांतीचें नादब्रह्म त्यांनीं नाचविलें पाहिजे.

विशेषतः ज्या भक्तिसांप्रदाय संस्था प्रौढ आणि संपन्न आहेत त्यांनीं स्वामी रामकृष्ण मिशन सारख्या संस्थेचे आदर्श पुढें ठेवून आपल्या कार्याला नवीन वळण दिले तर अशा नवीन प्रयोगांतूनही त्या त्या संस्थेच्या भक्तवृंदांतून एखादे स्वामी विवेकानंद किंवा एखादे रामतीर्थ प्रकट होऊन विश्वाचें मार्गदर्शन करून भयभीतांना आश्वासन देऊन भक्ति हा खरोखरीच पंचम पुरुषार्थ आहे हे स्वतः सिद्ध करतील.

श्री साईबाबांची सुद्धां हीच शिकवणूक होती. वाड्यांत श्री काकासाहेब दिक्षित, श्री देव वगैरे सारख्या भगवतांकडून एकनाथी भागवत, रामयण व ज्ञानेश्वरी सारख्या धार्मिक ग्रंथांचे प्रवचन सारखे चालू ठेवीत व आपल्या दर्शनास येणाऱ्या भक्तांना तें ऐकण्यास मुद्दाम आठवणीनें पाठवीत असत. यांत त्यांचा एवढाच उद्देश होता कीं ह्या भूमींतून 'चला कल्पतरूंचे अरव, चेतना चिंतामणीचे गांव' अशा विभूती अवतरून साई सांप्रदायांत अभिप्रेत असे विश्व कल्याणाचे पवित्र कार्य सिद्धीस जावो.

जसें आत्मज्ञान आम्हांला साहाय्यक आहे तसें सृष्टीचें विज्ञानहि आहे. ज्ञान आणि विज्ञान दोहोंचीहि आवश्यकता आहे. पक्षी दोन्हीं पंखांनीं उडत असतो. मानव जीवनाचे हे दोन पंख आहेत.

# आचार्य विनोबाजींची अमृतवाणी

सृष्टीला संख्येचा भार होत नाहीं, पापाचा भार होतो. पापामुळें प्रजा वाढली तर भार अवश्य होईल. प्रजा पापानें वाढूं शकते व पुण्यानेंहि वाढूं शकते. ती पापानेंहि घटूं शकते व पुण्यानेंहि घटूं शकते. प्रजा वाढो कीं घटो, पुण्य असेल तर भार होणार नाहीं, पाप असेल तर भार होईल, हानि होईल. ब्रह्मचार्यानें प्रजा घटली तर लाभ होईल. पौरुषहीनतेनें घटली तर हानि होईल; संयमानें घटली तर लाभ, कृत्रिम उपायांनीं घटली तर हानि, पुण्यानें वाढली तर लाभ, स्वैराचारानें वाढली तर हानि. माझा असा सिद्धान्त आहे कीं सृष्टीमध्यें जेवढे प्राणी व जंतू आले आहेत त्यांच्या पोषणाची व्यवस्था सृष्टीमध्यें आहेच. परंतु सृष्टीच्या सेवेसाठीं परमेश्वरानें आम्हांला जे दोन हात दिले आहेत त्यांचा पूर्ण उपयोग मात्र आपण करायला हवा.

## अनीतिमय उपाय

आजकाल कृत्रिमरीतीनें कुटुंबनियोजन करण्याच्या गोष्टी केल्या जात आहेत. लोक या गोष्टीचा विचार करीत नाहींत कीं, त्यामुळें अनीतीचा किती प्रचार होईल, आत्मसंयमनाच्या शक्तीचा किती ऱ्हास होईल, संपूर्ण जीवन किती पराक्रमशून्य होईल! या सर्व लोकांचा एक ऋषि होऊन गेला त्याचें नांव 'मालथस.' त्याचा असा सिद्धान्त आहे कीं, प्रजा किंवा संतान जास्त वाढल्यास जमीन त्यांचें पोषण करूं शकणार नाहीं. अहो, मग ॲटम् व हायड्रोजन बॉंब तयार होऊं लागले म्हणून आरडाओरड कां करतां? छानच झालें, तेवढेच लोक मरतील! थोडे लोक शिल्लक राहतील म्हणून मग दुःख कां करतां? आपणाला पराक्रमशील व्हायचें आहे, कर्मशील व्हायचें आहे, परिशोधक वृत्ति ठेवायची आहे. यासाठीं जर विज्ञान वाढविणें जरूर असेल तर अवश्य वाढवावें. सृष्टीमध्यें विज्ञान जितकें वाढेल तितकी सृष्टि अधिक उन्नत आणि समृद्ध होईल. म्हणून विज्ञानाचा खूप उत्कर्ष व्हावा अशी माझी इच्छा आहे.

कांहीं लोकांना वाटतें कीं विनोबाला विज्ञान नको, त्यांना फक्त चरख्याचा प्रचार करावयाचा आहे. पण ही समजूत

चुकीची आहे. मला चरखाहि हवा आहे. आणि विज्ञानहि हवें आहे. लोक म्हणतात, विमानाची गति खूप वाढली आहे, पांच तासांत दिल्लीला जातां येतें. मी असें विचारतों कीं तुमचें विज्ञान एवढ्या-वरच कां थांबतें ? विमानांत पांच पांच तास बसून कंटाळा येतो असें तुम्हीच म्हणतां, मग एवढी सुधारणा करा आणि अशी व्यवस्था करा कीं विमानांतसुद्धां व्यवस्थितपणें कांततां येईल. एवढें जर जमलें नाहीं तर विज्ञानाचा काय उपयोग !

## ज्ञान आणि विज्ञान

जसें आत्मज्ञान आम्हांला साहाय्यक आहे तसें सृष्टीचें विज्ञानहि आहे. ज्ञान आणि विज्ञान दोहोंचीहि आवश्यकता आहे. पक्षी दोन्हीं पंखांनीं उडत असतो. मानव जीवनाचें हे दोन पंख आहेत. मानव समाजाचं -अगदीं प्रारभापासूनच आत्म-ज्ञान आणि विज्ञान प्राप्त करण्यांची धड-पड चालू आहे. विज्ञान खूप वाढावें असें मला वाटतें. पण त्याबरोबरच माझी अशी इच्छा आहे कीं, त्यांचा सदुपयोग करण्याची अक्कल आमच्यामध्यें असावी अग्नीचा उपयोग स्वयंपाक करण्यासाठींच करायचा असतो, घरांना आगी लावण्या-साठीं नाहीं. विज्ञानाचा खूप विकास व्हावा व त्याचा सदुपयोग करण्याची शक्ति आमच्यामध्यें असावी अशी माझी इच्छा आहे. लोक म्हणतात कीं आतां ॲटमचें युग आलें आहे व त्याचा उपयोग लोक कल्याणकारी कामासाठीं होऊं शकतो. ॲटम युगांत खेड्यांचा कारभार कसा चालेल ? मी म्हणतों कीं या युगाचाहि स्वाद आपण चाखावा. अणुशक्तीचा उप-योग होऊं शकेल तितका करावा. अणु-शक्ति विकेंद्रित करून गांवोगांवीं तिचा उपयोग करण्यांत यावा. म्हणून विज्ञा-नाच्या शोधाबद्दल मला आदर आहे.


## विजेचा उपयोग

मी विजेचा उपयोग करायला तयार आहे; पण ती कशा तऱ्हेनें वापरावी हा मुद्दा महत्वाचा आहे. मूठभर लोकांच्या हातीं जर आपण ही शक्ति दिली तर ती शोषणाचें साधन बनेल. आज हेंच चालू आहे आणि यालाच माझा विरोध आहे. वीज पहिल्यानें कोठें येते ? मोठ्या शहरांत मग ती खेड्यापाड्यांत जाणार. दूरदूरच्या खेड्यांत तर ती जातच नाहीं. तिचा फायदा सर्वांना सारख्या प्रमाणांत मिळत नाहीं. तिचें भांडवल श्रीमंतापाशींच राहणार. गरीबांपाशीं नाहीं. म्हणून विजेची शक्ति गरीबांच्या उपयोगाची नाहीं. उलट ती त्यांचें शोषण करील. लोकांना निव्वळ उजेड देण्यासाठीं विजेचा उपयोग होईल तर त्याचा परिणाम एवढाच होईल कीं लोक रात्रीं जागरण करूं लागतील, त्यांचे डोळे बिघडतील आणि किडे त्यांना सताव-तील. गरीबांसाठीं विजेचा उपयोग जवळ जवळ शून्यच आहे. विजेची आवश्यक तं. साधनें जर सर्वांना दिलीं व तिचा उपयोग होऊं शकला तर तिचा लाभ सर्वांना मिळेल. एवढें करावयाला तुम्ही तयार असाल तर मी विजेचा उपयोग करावयाला तयार आहे. विज्ञानाचा अत्यंत उत्कर्ष व्हावा असें मी इच्छितों, कारण मी अहिंसावादी आहे, हिंसावादी नाहीं.

## हिंसा आणि विज्ञान

विज्ञानाचें लग्न जर हिंसेशीं लागेल तर मानवाचा सर्वनाश होईल; म्हणून विज्ञानाचें

लग्न अहिंसेशीं व्हायला हवें. विज्ञान आणि अहिंसा यांच्या संयोगानें पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल. हिंसा आणि विज्ञान यांच्या संयोगानें मानवाचा संहार होईल. मानवानें उपयोगाचीं दुसरीं साधनें अवश्य बनविलीं पाहिजेत. परंतु विमान आलें तरी मी पायीं चालणें बंद करणार नाहीं. सर्वत्र पायीं फिरेन. लोकांनीं आजकाल पायीं चालणेंच बंद केलें आहे. आठ दहा मैल चालायचें असेल तर पायीं चालावें व खूप दूर जावयाचें असेल तर वाहानाचा उपयोग करावा. तुम्हांला वेळ वाचवायचा आहे कीं स्वतःला वांचवावयाचें आहे ? हा माझा प्रश्न आहे. कांहीं लोक म्हणतात कीं, आम्हीं पायीं चालणारच नाहीं व मोटारनें प्रवास करून लवकर लवकर कामें उरकूं. पूर्वी ज्या कामाला पांच वर्षें लागत तें आम्हीं पांच मिनिटांत करूं. अशा लोकांना मी असें सांगू इच्छितों कीं ईश्वरानें जर तुम्हांला म्हटलें कीं मीसुद्धां तुम्हांला शंभरऐवजीं पन्नास वर्षांतच उचलून नेतों तर तें तुम्हांला आवडेल काय ? जशास तसें हा ईश्वराचा न्याय आहे. म्हणून दीर्घायुषी बनायचें असेल तर रात्रीं सिनेमा पाहतां कामा नये, शाळेंत पायीं गेलें पाहिजे, कपडे धोब्याकडून धुऊन घेतां कामा नयेत आणि रात्रीं गाढ झोंप घेतली पाहिजे. विज्ञान तर वाढावेंच पण त्या बरोबरच अहिंसा व अक्कलसुद्धां वाढावी अशी माझी इच्छा आहे. अहिंसा आणि अक्कल मिळून आत्मज्ञान होतें. म्हणून आत्मज्ञानाबरोबर विज्ञान हवेंच.



शठाशीं नम्रता, कुटिलाशीं प्रीति, निसर्गतःच कृपणाशीं सुंदर नीति, मायाबद्धाला ज्ञानबोध, अति लोभ्याला वैराग्योपदेश, क्रोध्याला शांतिकथन आणि कामीजनांना हरिकथा या गोष्टी म्हणजे खडकाळ जमिनींत बीजारोपण करून फलाकांक्षा करण्यासारख्याच होत.

**कै. संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांच्या अमर जीवनांतील दोन—**

# अविस्मरणीय स्मृतिचित्रें

१

शनिवार दिनांक २४–११–५६. रात्रींचे सव्वा दहा वाजले होते. बाबांची प्रकृति अजून फिरण्या–चालण्याइतकी सुधारलेली नव्हती. नामदार तपासे यांच्या बंगल्यावरील एका खोलींत नामदार तपासे, सौ. बाईसाहेब व कांहीं सेवकांच्या सान्निध्यांत श्री बाबा होते. बिछान्यावर बसल्या बसल्या समोर असलेल्या सर्व मंडळींना खालीं बसवून श्री बाबा म्हणाले, 'आजचा दिवस सुवर्णाचा वाटतो, म्हणून थोडे भजन करावे असें मनांत आहे.' तेव्हां आम्ही सर्व मंडळी श्री बाबांनी केलेल्या इषाऱ्याप्रमाणें सभोंवार त्यांचे अंथरुणाचे शेजारीं बसलो. मग श्री. बाबांचे आवडते भजन आम्हां सर्वांना माहीत होते तें श्री वासुदेवराव सोनावणे यांनीं सुरूं केले... "गोपाला! गोपाला! देवकीनंदन गोपाला" हे शब्द ऐकून श्री बाबा म्हणाले, नाहीं नाहीं. मी सांगतो तसें म्हणा.

कोणी म्हणो आम्हाला कांहीं ।
त्याची लाज आम्हाला नाहीं ।
आम्ही लागलो हरीचे पायीं ॥

हे भजन ३–४ वेळां सर्वांना म्हणावयास लावून, श्री बाबांनीं बसल्या बसल्याच किर्तनाला प्रारंभ केला.

गुरें चारितां गव्हारी ।
माझे म्हणे परी लाभ नाहीं ॥

सर्व जीव संसारांत बुडून राहिले, त्यांना दुसरें कांहीं सुचत नाहीं–दिवसभर हे माझे, ते माझे, सर्व माझे! असें चालले आहे जगाचें रहाटगाडगें! जंगलांत गुरें चारणाऱ्या गुराख्याच्या पोराला विचारा–हे बैल कुणाचे? तो म्हणेल ह्या गाई माझ्या, हे बैल माझे, ह्या बकऱ्या माझ्या! संध्याकाळ झाली म्हणजे गुरांना पाणवठ्यावर पाणी पाजून, तीं गुरें तो आपआपल्या मालकाच्या घरीं पोचवितो आणि एकटाच घोंगडीं व काठी घेऊन आपल्या घरीं येतो. हातपाय धुवून जेवून झोंपतो. आई त्याला पोटाशीं घेते, त्याचे मुके घेते–कुरवाळते–इतक्या गुरांचा मालक पण त्याचा लाभ त्याला काय? तसा हा संसार असार आहे. त्यांत कांहीं लाभ नाहीं. संसारसुखाचा करून लाभ पाहिजे असेल तर श्रीतुकोबाराया आपल्या अभंगांत म्हणतात—

**तुका म्हणे कीर्तन पसारा ।**
**लाभ येतो बरा पाहिजे तो ॥**

लाभाची प्रतिक्षा करत फिरावें लागत नाहीं, तो मागावा लागत नाहीं, कर्तव-

गारीनें सहज प्राप्त होतो. रस्त्याच्या फूटपायरीवर ज्योतिषी पंचांग घेऊन बसतो. एक आणा दिला म्हणजे लाभ सांगतो. राहू, केतू दोन्ही तुझ्या राशीला आले आहेत, त्यांची पूजा केली पाहिजे, त्यासाठीं अनुष्ठान केलें पाहिजे, १। रुपया पाहिजे. वेळ गेला, एक आणा गेला, सव्वा रुपयावर गंडांतर आलें! त्याला लाभ न होतां नुकसानच येतें. या अशा फुटपायरीवर बसणाऱ्या ज्योतिषाला लाभ कशांत आहे, हें नक्की माहित असतें तर ते फुटपायरीवर बसलेच असते कशाला? ते तर राजे झाले असते. परंतु लाभ हा सर्वस्वी आपआपल्या कर्तबगारीवर अवलंबून आहे. भक्तिभावानें सर्व लोकांस करून उद्योगास लावले तर, जे जे लाभ मागाल ते ते लाभ तुम्हांला आपोआप मिळतील. माझाच पुरावा घ्याना! घरीं असतांना आम्हीं तिघें–आई, कुटुंब, मी व दोन मुलें दिवसभर काम करून दुपारीं घरीं येत असूं. मग दोन घांस खाऊन बाजार करण्यास तीन मैल जावें लागत असे. बाजार करण्यास जवळ फक्त आठ आणे, त्यांत काय घ्यावें? सर्व बाजार फिरून विचारावे. कांदे सहा आणे, वांगीं आठ, आठ आणे, त्या आठ आण्यांत काय घ्यावें ही पंचाईत पडे. पण आज त्या सर्व वस्तू एका ईश्वराच्या भजनाच्या लाभानें मिळाल्या. नको म्हणत असतांहि सर्व प्राप्त झाले. असा नामाचा प्रताप आहे.

एकदां आजारी पडलो. खेडेगांव–ना वैद्य, ना डॉक्टर. प्रथम जोरांत थंडी वाजून आली. घरांत एकटाच. कसा तरी दम धरून राहिलो. थंडी कमी झाली आणि ताप भरला. सोस लागून लागून तहान लागली. पाणी कोणी देईल? खेड्यांत घराच्या बाहेर सपरीत पाण्याचे रांजण भरून ठेवलेले असतात. त्यावर झांकण नसते–कुत्रीं, मांजरे, कावळे–जनावरें त्यांत तोंड घालतात-असें पाणी पण उठून घ्यावें लागणार होते. पाण्याच्या तगमगीने मोठ्या कष्टानें उठलो. घरांतून बाहेर आलो. अंगावर कपडा नाहीं. घेतले पाण्याचे गडवे आणि तोंडाला लावून घटाघटा पाणी प्यालो. पाणी मिळाले पण पहिल्या जागेवर जातां येईना. तिथेंच पडून राहिलों. सायंकाळ झाली. जंगलातून आई वगैरे मंडळी आली. त्यांना म्हटलें, आई, माझें अंग दुखतें. आई म्हणाली, मग दुखतें तर तुला काय धरून बसूं आणि संध्याकाळीं काय खाऊं! दुखते तर पडून रहा. होईल आपोआप बरें! असे दोन चार दिवस गेले. जीव वैतागला. एक दिवस शेतावर गेलो आणि सारा दिवस उन्हांत पडून राहिलो. उन्हांचे चटके बसेतो पडून राहिलो. ४–५ दिवसांनीं खरोखरच ताप आपोआप राहिला.

आज या वेळीं तो दिवस आठवतो मी आजारी आहे. तुम्हीं सारी कितीतरी माणसें जवळ आहांत, किती प्रकारचीं औषधें आहेत. कितीतरी डॉक्टर येत आहेत! हें सुख मी या मार्गाला लागलो म्हणून मिळालें. भजनाचा हा लाभ आहे. माझें माझें म्हणून बायकापोरांत गुंतलों असतो, तर कांहीं लाभ तर झालाच नसता पण आजपर्यंत मेलोहि असतो. कुटुंबाचे पायदळणीं मरून गेलो असतो.

एक दिवसाचे अन्न घरीं खायला नसायचे. अंबाडीची भाजी आणून शिज-वायची, त्याला मीठ नाहीं, मिरची नाहीं—मग तेल कुठले? तसेंच गोळे तोडून पोटांत गटागट घालावे लागत असत. असे कठीण दिवस काढून, तावून सुला-खून निघालेले हे शरीर आज या सर्व सुखाला पात्र झाले. ते सुख सांगता येत नाहीं. माझे कांहीं दुखत नाहीं—कांहीं नाहीं. तुम्हां सर्वांच्या देखत आजचा दिवस मोठा, चांगला—सुवर्णाचा—आहे असे वाटते.

सुखासाठीं सर्वांची तळमळ आहे-पण सुख कशांतही नाहीं—धनवान मानवांत—अधिकारी लोकांत—यांच्या घरीं तर नाहींच नाहीं पण पंडीत नेहरू सरकारच्याहि घरीं नाहीं. ते सुख कोठे आहे तर-तुकोबारायांनीं सांगितलें आहे—

**सुख वसे एके ठायीं।**
**बहुपायीं संतांच्या॥**

संत सांगतात, "मनासारिखें न होता। बालकांशी मारे माता॥" आईने सांगितलेले काम मुलाने केले नाहीं, तर आई वाट पहात नाहीं, लगेच सपाटा ठेवून देते.

आपण आज ज्यांच्या घरीं बसलों आहोंत ते मंत्री आहेत. यांचा मोठा धाक आहे! बाईसाहेब आहेत, त्यांना चार मुलें आहेत. पुढें मुलांची लग्नें होतील, सुना येतील. त्या बाईचें ऐकणार नाहींत—एक पुढेंच बोलेल. दुसरी न विचारतां खाईल, त्यांना कसें आवरावे—तर हें सुख नसून दुःख आहे. हा बंगला सोडून जावें लागेल. सर्व दुःख आहे! बरं सुनेला मारावें तर लोक तमाशा पाहतील. मुलगा कांहीं बोलत नाहीं, ज़वान झाल्यावर वेगळा निघणार, वगैरे हीं सर्व दुःखेंच नाहींत कां?

मनुष्य पाप आणि पुण्य समजत नाहीं. आज या साहेबांच्या दारांतूनच आपल्याला लवून नमस्कार करून आंत यावें लागत आहे. उद्यां हा दिवस बदलला म्हणजे गाडी उलट होईल! म्हणून तुकोबाराया म्हणतातः—

राजे होती रंक, यमाचिये घरीं।
नांदणूक बरी। नाहीं म्हणूनी॥

ज्यांची करणी बरी नाहीं, ते राजेसुद्धां यमाच्या दरबारांत शेवटीं रंक होतात व आपल्या कृतकर्मांची फळें भोगतात.

कविता, किर्ती, कांता, आणि कांचन यांना स्वतःचें जीवन नसतें. दुसऱ्या-साठीं त्याग करणें यांतच त्यांची अलौकिता आणि श्रेष्ठता साठवलेली आहे.

२

## देवाला कुठं मरण असतं !

दिवाळीचे दिवस–घरोघर आनंदाचे वातावरण होते. श्री बाबा या दिवाळीच्या ऐन मोसमांत मुंबईसच होते. तीन तारखेला श्री बाबांच्या किर्तनाचा कार्यक्रम चिराबाजारांत अगोदरपासून जाहीर झाला होता म्हणून अमरावतीहून बाबा तीन तारखेला येथें आले होते. श्री. बाबा गेली १९ वर्षे रोज दोन घरीं माधुकरी मागूनच पोटाचा क्षुल्लक (त्यांच्या दृष्टीनें) प्रश्न सोडवतात. अशाच माधुकरीची ही एक गोष्ट आहे. श्री बाबा भायखळ्याला एका घरीं माधुकरीसाठीं जाऊन उभे राहिले. ते घर एका माळी जातीच्या बाईचे होते. श्री बाबा आपल्या घरासमोर आले हे पाहून तिच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. त्या आनंदाच्या भरांत तीं बाई घरांत गेली आणि एक ताटभर करंज्या घेऊन आली व ते ताट तिनें श्री बाबांचे ठेविलें. श्री बाबांनीं तिला हे ताट परत घेऊन जा व मला भाकर आणून दे, अशी मागणी केली. त्या बाईनें श्री बाबांच्या इच्छेप्रमाणें भाकरी आणून त्यांच्यासमोर ठेविली. श्री बाबा तिच्या दारांत बसले. भाकरी खायला सुरुवात केली. ती बाई पण श्री बाबांच्या समोर येऊन बसली. ती बसलेली पाहून तिची एक शेजारीण पण तिच्याजवळ येऊन बसली. दोन बायका एका ठिकाणीं आल्या म्हणजे साहजिकच गप्पांना ऊत येतो. ती माळीण आपल्या शेजारणीला म्हणाली, ‘माझ्या लहानपणीं ज्यावेळीं माझें लग्न झालें नव्हते त्यावेळीं मी बाबांना पाहिले होते, त्यावेळीं जसे बाबा दिसत होते–तश्शीच कांती व प्रकृति अजून कायम आहे त्यांची !’

या तिच्या जुन्या आठवणीवर श्री बाबांनीं शेजारणीला विनोदानें उत्तर दिलें. “ही लहान होती तेव्हां मी जसा होतो तसा आज पण आहे—खरं आहे मी अजून खंगलो कां नाहीं ? अजून मेलो कां नाहीं ? असंच ना तुला म्हणायचं आहे ?”

बाई म्हणाली “बाबा ? असं कसं म्हणीन मी. तुम्ही कसे मराल ? तुम्ही माणसाचे देव झाला, देवाला कुठं मरण असतं होय ?”

बाबा म्हणाले “देव झालो म्हणतेस पण मी तर तुझ्यासारखा माणूसच आहे. माणसानं मरायचं नाहीं तर मग काय दगडानं मरायचं ?”

यावर बाई म्हणाली, “बाबा ! मला तसं म्हणायचं नाहीं. तुकाराम जसे विमानांत बसून वैकुंठाला गेले, तसें मरण तुम्हाला येणार–ते जसे देव झाले तसेच तुम्ही नाहीं कां ?”

श्री बाबांनीं यावर विनोदी उत्तर दिलें. ते म्हणाले, “बाई, माझी कुठं तशी पात्रता आहे ? तुकाराम विमानांतून वैकुंठाला गेले. आम्हांला गाढव तरी मिळेल कां वैकुंठी जायला ? आम्ही आपले पायींच पोहोंचणार !”

प्राप्त झालें अद्वैत ज्ञान । अभिन्नपणें जें विज्ञान ।
तेंचि जाण आत्मनिवेदन । जेथें मी तूं नाहीं ।।

# भक्ति आणि विभक्ति

आत्मनिवेदन म्हणजे 'देवासी वाहावें आपण' हें होय. देव कोण, आपण कोण व वाहणें म्हणजे काय, हें नीट कळल्याशिवाय आत्मनिवेदन यथार्थ समजणार नाहीं. देवाला म्हणजे उपास्य-मूर्तीला गंध, फूल, धूप, दीप, नैवेद्य वस्त्र हें वाहतां येतें; नाथांनीं म्हटल्याप्रमाणें 'दारासुतगृहप्राण, करावें भगवंतासी अर्पण.' हेंही वेळेला करितां येईल; पण आपण आपल्याला वाहायचें म्हणजे काय, हें मात्र कळणें कठिण आहे! आपलीं बायकामुलें, घरदार, जमीनजुमला, स्थावर जंगम इस्टेट, आपली बुद्धि, आपलें मन, व आपला अहंकार हे सर्व देवाला वाहिल्या-वरही जो 'आपण' म्हणून उरतो तोही देवाला वाहणें ही खरी आत्मनिवेदनभक्ति होय. सलोकता, समीपता, व सरूपता ह्या तीन मुक्ति चळ आहेत, सायुज्यता मुक्ति मात्र अचळ आहे. 'सगुणभक्ति ते चळे । निर्गुणभक्ति ते न चळे ।' अशी अचळ भक्ति व अचळ मुक्ति आत्मनिवेदना-शिवाय प्राप्त होत नाहीं व ते आत्मनिवेदन कळण्यास तत्त्वविचार करावें असें सम-र्थांनीं म्हटलें आहे. श्रवणभक्ति हा प्रारंभ व आत्मनिवेदनभक्ति हा शेवट.

आत्मनिवेदन यथाशास्त्र होण्यास देव कोण व मी कोण, याचा विवेकानें उलगडा झाला पाहिजे. देव कोण तो ओळखावा व आपला आपण अंतर्यामीं शोध घ्यावा. देव आणि भक्ति हे अभिन्नपणानें पाहणें म्हणजेच हृदयभुवनांत जीव आणि परमात्मा एका आसनावर बसविणें होय. 'भक्त म्हणजे विभक्त नव्हे तो' हा विचार दृढ झाल्या-वांचून समाधानाची प्राप्ति नाहीं. भक्त म्हणजे देवापासून आपल्याला वेगळेपणानें न पाहणारा. जो विभक्त आहे, म्हणजे देवाहून मी वेगळा आहे असें भासवतो, तो भक्त नाहीं. पण हा 'मी' कोण ? ह्या 'मी' ला कोठें धुंडावें ?

पिंड आणि ब्रह्मांड असे वेगळे कल्पून पिंडांतच पिंडाचा विचार करायचा व तोच विचार ब्रह्मांडाला लागू करायचा. **'पिंडीं तें ब्रह्मांडीं'** हा न्याय बरोबर आहे. एक उदाहरण सोडविलें कीं, त्या जातीचीं हजारों उदाहरणें तशींच सुटतात. एकदां रीत समजली म्हणजे झालें. पिंडही पांचभौतिक व ब्रह्मांडही पांचभौतिक. पिंडाचा एकदां यथार्थ विचार झाला, कोणकोणत्या तत्त्वांचा तो गोळा बनला आहे तें उमगलें म्हणजे ब्रह्मांडाचा विचार कांहीं निराळा करायला नको आहे. सकळ दृश्य तत्वरूप आहे, तत्वांचें गांठोडें आहे, तें सोडूं लागलो म्हणजे गाठोडें कोठेंच सांपडत नाहीं! पिंडांतलें एकेक तत्व

घेऊन त्याची विल्हे लावूं लागलों म्हणजे त्यांत 'मी' हा पदार्थ कांहीं कोठें सांपडत नाहीं! सहज आत्मनिवेदनाचा हा सुलभ मार्ग आहे. 'मी' ला आपण शोधीत नाहीं, तोंपर्यंतच तो आपला करडा अंमल इंद्रियांवर चालवीत आहे; पण त्या 'मी' ला आपण शोधूं लागलों कीं त्यानें आपलें काळें केलेंच म्हणून समजावें! त्या 'मी' ला दडवणें हेंच आत्मनिवेदन. हा भव्य विश्वाकार नाना व्यक्तींनीं भरून गेला आहे. हें विश्व म्हणजे, ज्ञानोबारायांनीं म्हटल्याप्रमाणें, भूतसृष्टीची प्रचंड टांकसाळ आहे.

तथापि लटकी देहअहंता मध्येंच हा 'मी' उत्पन्न करिते, पण 'विचारें पाहों जातां कांहींच नाहीं!' 'तत्वेंच मी' हा जो भ्रम आपणांस झाला आहे, तो घालविण्यासाठीं आपण तत्वांहून वेगळे होऊन पाहण्याचा अभ्यास ठेवावाः—

तत्वें साक्षत्वें वोसरती।
साक्षत्व नुरे आत्मप्रचिती॥
आत्मा असे आदिअंतीं।
आपण कैंचा॥

मी तत्वांचा साक्षी आहे, तेव्हां त्याहून भिन्न आहे असें आधीं जाणावें. हा अभ्यास दृढ झाल्यावर मग तें साक्षित्वही आत्मप्रचीतीनें दूर करावें; कारण समर्थांनीं दुसरीकडे म्हटल्याप्रमाणें 'त्यांत साक्षत्वाचा दोरा। तोही तत्वरूप!' तत्वें साक्षित्वानें दूर करावींत व साक्षित्व निश्चयपदप्राप्तीनें दूर करावें. निश्चळ पद तुटेना, फुटेना, चळेना, ढळेना असें आहे. अशा स्वरूपाची प्राप्ति हीच सायुज्यगति, हाच मोक्ष, हेंच सर्वांस साधावयाचें अंतिम ध्येय आहे. आत्मा स्वानंदघन आहे. 'आत्मा आहे निर्गुण व निरंजन' व त्याच्याशीं आपण अनन्य झाल्यावर आपण अनन्यपणानें उरणार कसे? आत्मा आहे अद्वैत, मग माझ्यावेगळ्या द्वैताला अवकाश कसचा सांपडणार? 'आपण मिथ्या साच देव। देव भक्त अनन्यभाव' असा अनुभव आला म्हणजे आत्मनिवेदन सहजच होतें. स्वरूपीं दृढबुद्धि झाल्यावर जीवशिवउपाधीच समूळ नाहींशी होते. मग मीपणाला वाव



जीवन हें रेशमाच्या किड्यासारखें असावें. रेशमाचे तंतू जगाला पुरविण्यांत त्या किड्याचा काय स्वार्थ असतो सांगा?

कोठें मिळणार ? देवाशीं अभिन्नपणाची जी अखंड भावना तेंच खरें आत्मनिवेदन होय. समर्थांनीं आत्मारामग्रंथांत म्हटलें आहेः—

प्राप्त झालें अद्वैतज्ञान ।
अभिन्नपणें जें विज्ञान ।
तेंचि जाण आत्मनिवेदन ।
जेथें मी तूं नाहीं ॥

सर्व संतांचा एकच अनुभव आहे व एकच बोध आहे. नाथमहाराज भागवतांत (अ० ३–८३९) म्हणतातः—

द्वैतभावें भजनविधी ।
ते जाणावी स्थूल बुद्धि ।
भजनाची भजनसिद्धी ।
जाण त्रिशुद्धी तन्मय होणें ॥

श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं गीतेच्या शेवटीं ' मामेकं शरणं व्रज यावर टीका करितांना म्हटलें आहेः—

मग अज्ञान निमालिया ।
मीचि ऐक असे अपैसया ॥
सनिद्र स्वप्न गेलियां ।
आपणपैं जैसें ॥
तैसा मी एकवांचूनि कांहीं ।
मग भिन्नाभिन्न आन नाहीं ॥
साहंबोधें तयाच्या ठायीं ।
अनन्य होय ॥
पैं आपुलेनि भेदेंवीण ।
माझें जाणणें जें एकपण ॥
तयाचि नांव शरण ।
मज येणें गा ॥

श्रीतुकाराम महाराज सांगतातः—

देह नव्हे मी हें खरें ।
उरला उरे विठ्ठल ॥ १ ॥
म्हणउनि लाहो करा ।
काळ सारा चिंतनें ॥ २ ॥
अमर आहां अमर आहां ।
खरें कीं पहा खोटें हें ॥ ३ ॥
न म्हणा देह माझा ऐसा ।
मग भरंवसा कळेल ॥ ४ ॥
देवचि बरे देवचि बरे ।
तुका म्हणे खरे तुम्ही ॥ ५ ॥

## पूर्णोद्धार

तरुवर बीजापोटीं ।
बीज तरुवराशेवटीं ॥
तैसें तुम्हां आम्हां जालें ।
एकीं एक सामावलें ॥
उदकावरी तरंग ।
तरंग उदकाचें अंग ॥
तुका म्हणे बिंबछाया ।
ठायीं पावली विलया ॥

*

लवण मेळवितां जळें ।
काय उरलें निराळें ॥
तैसा समरस जालों ।
तुजमाजीं हारपलों ॥
अग्निकर्पूरांच्या मेळीं ।
काय उरली काजळी ? ॥
तुका म्हणे होती ।
तुझी माझी एक ज्योती ॥

*

बीज भाजुनि केली लाही ।
आम्हां जन्ममरण नाहीं ॥
आकारासी कैंचा ठाव ।
देह प्रत्यक्ष जाला देव ॥
साखरेचा नव्हे ऊंस ।

आम्हां कैंचा गर्भवास ॥
तुका म्हणे अवघा जोग ।
सर्वां घटीं पांडुरंग ॥

मरणाहातीं सुटली काया ।
विचारें या निश्चयें ॥
नासोनीयां गेली खंती ।
सहजस्थिती भोगाची ॥
न देखेसे जाले श्रम ।
आलें वर्म हातां हें ॥

तुका म्हणे कैंची कींव ।
कोठें जीव निराळा ॥
गोडीपणें जैसा गूळ ।
तैसा देव जाला सकळ ॥
आतां भजों कवणेपरी ।
देव सबाह्य अंतरीं ॥
उदकावेगळा ।
नव्हे तरंग निराळा ॥
हेमअळंकारा नामीं ।
तुका म्हणे तैसे आम्हीं ॥

---


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत रु. | ७—०—० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, ,, | ४—०—० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ—स्तवनमंजरी | | ,, ,, | ०—२—० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, ,, | ०—८—० |
| (५) | सगुणोपासना | | | ०—३—० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, ,, | १—०—० |
| (७) | श्री साई—लीलामृत | | ,, ,, | २—०—० |
| (८) | श्री साई—सुमनांजली | | ,, ,, | ०—१—० |
| (९) | कीर्तन—पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | | ,, ,, | १—८—० |
| (१०) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा—अवतार व कार्य | | ,, ,, | २—०—० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | | ,, ,, | ०—२—० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | | ,, ,, | ४—८—० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट—शिरडी, जि. अहमदनगर.
(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. १

# स्वामी रामतीर्थांचीं बोधवचनें

संकलक : लक्ष्मीकांत ना. गिंडे

(१) उद्योग, दीर्घोद्योग, अविश्रांत परिश्रम हेंच यशःप्राप्तीचें मुख्य साधन आहे.

(२) कोणतेंहि कार्य करीत असतांना तद्रूप होणें हाच एक यशाचा उपाय आहे.

(३) प्रत्यक्ष यशाची प्राप्ती होण्यापूर्वी यशाच्या वासनेचा पूर्ण निरास—बीमोड झाला पाहिजे.

(४) निरपेक्षबुद्धीनें कर्म करणें हाच वेदान्तप्रतिपादित वैराग्याचा अर्थ होय.

(५) लोकांच्या आपणांसंबंधीच्या चांगल्या किंवा वाईट भाषणाला किंवा वर्तनाला आपल्या अंतःकरणांत थारा देऊं नका; तें स्वप्नवत्, मिथ्या आणि भ्रामक आहे ही गोष्ट लक्षांत ठेवून त्या संबंधाचे विचार अजिबात विसरून जा.

(६) श्रद्धेचा ओघ बहिर्मुख न करतां तो अन्तर्मुख करणें, स्वतःकडे आत्म्याकडे वळवणें, आत्मश्रद्धा ठेवणें हा मार्ग किती सरळ व स्वाभाविक आहे बरें!

(७) परिस्थितीचा विचारच सोडा. आपली श्रेष्ठता ओळखून नेहमीं न्यायाधिशाप्रमाणें वागत जा.

(८) कर्तव्याचें दडपण झुगारून द्या. तो एकप्रकारचा उत्साहवर्धक व्यायाम आहे, करमणुकीचा खेळ आहे, असें समजून एखाद्या बादशाहाप्रमाणें, चैनींत आपलीं कामें करीत जा.

(९) ईश्वरापुढें दुसऱ्या कशाचीहि किंमत मानूं नका; त्याच्याइतकें कोणत्याच गोष्टीला महत्त्व देऊं नका.

(१०) 'अहं ब्रह्मास्मि' या भावनेचा निदिध्यास करा.

(११) तुम्हीं जेव्हां निराश झालां असाल, जेव्हां उदासीनता आणि उद्विग्नता यांचा तुमच्या मनावर पगडा बसला असेल तेव्हां आपल्या नात्यागोत्याचे संबंध, विषयांवरील आसक्ति, मनांतील सर्व तऱ्हेच्या इच्छा, कामना आणि आकांक्षा यांना फांटा देण्याचा प्रयत्न करीत जा. आपण स्वतंत्र आहों, मुक्त आहों, अशी दृढ भावना करीत जा.

(१२) बाह्य प्रतिकूल परिस्थितीचा मनावर यत्किंचितहि परिणाम न होणें, संकटांत खचून न जातां वृत्तीची शांतता केव्हांहि भंगू न देणें हीच ईश्वरभक्ति अंगीं बाणल्याची खूण होय!

# नंदादीप

अष्टदिशांतुनि दाहिदिशांतुनि
कोनाकोनांतुनी ।
लक्ष लक्ष चमकती तारका चमचम
गगनांतुनी ॥ १ ॥

अस्त रवीचा उदय शशीचा लपंडाव चाले।
चटक चांदणी चंद्राशीं मग
शिवाशिवी खेळे ॥ २ ॥

पश्चिम दिग्वधु गालीं चढली
लाली मजेदार ।
येई संध्या उषा मंदिरीं कशी झोकदार ॥३॥

सडे टाकितां रांगोळींच्या रांगांना भरती ।
गुढ्या तोरणे ध्वजा पताका
वाऱ्यावर डुलती ॥ ४ ॥

रत्नदीप ते रंग उधळती विविध प्रकारांनी ।
उजळुनि गेले धवल प्रकाशे
नगरही ज्योतांनी ॥ ५ ॥

दीपावलिच्या दीपपंक्ती या सुखविती
सौख्याला ।
झगझगाट अन् लखलखाटही
दिपवी नयनाला ॥ ६ ॥

मिणमिण करिती दूर कुठे त्या पणत्या
लुकलुकती ।
बाह्यरंग सजविले जरी ना अंतरंग खुलती॥७॥


साधुसंत जन येती घरीं ज्या चेततील दीप ।
भक्तिरसाचा तेवत राहिल अखंड
नंदादीप ॥ ८ ॥

**—गोवर्धनदास डोळे,** (पुणे)

---

# श्रीदासगणुकृत भूपाळी

झाला बालभोग आतां उघडावें द्वार ।
गरूडपारीं आले देवा वैष्णव डिंगर ॥
गहिनीनाथाचा तो शिष्य निवृत्तिदातार ।
घाली दंडवता तुम्हां जोडुनियां कर ॥
तुझिया कृपें ज्यानीं देवा रेडा बोलविला ।
प्रवरेच्या तटीं ग्रंथ ज्ञानेश्वरि केला ॥
ते हे वैष्णवांचें गुरू श्री ज्ञानेश्वर ।
चांगा, नामा, जनी, कान्हो,
नरहरि सोनार ॥
महाद्वारिं राहुन चोखा करीत जोहार ।
मंगळवेढ्याहुनी आले तव ठाणेदार ॥
कुलाल, बंका, राका, वंका, मुक्ता, सोपान ।
देवगिरीचे सुभे आले पंत जनार्दन ॥
पैठणींचे आले असती भानुदास देवा ।
नामयाचा गुरू खेचर विसोबा बरवा ॥
ज्याचे सदनीं देवा तुम्ही पाणक्या झालां ।
गोदातटिंचा साधू तो हा एकनाथ आला ॥
डोईस गोफण हातांत खुरपें
मणि तव कंठीचा ।
आला तो सांवता माळी अरणभेंडीचा ॥
भवाब्धींचें केवळ तारूं श्री देहूकर ।
तुकोबा ते आले आतां कांहो उशीर ॥
ज्याचेसाठीं आपण बसलां राखण शेताला।
धामणगांवींचा तो पाटिल बोधला आला॥
आवड देवा तुम्हां बहु निंब राजाची ।
देव इच्छितताती लाही ज्याच्या काल्याची॥
संतचरित्रीं ज्याचा प्रेमा जडला आनिवार।
तो हा महीपती आला साधू तहाराबादकर॥
निळा, शेखमहंमद, सखू, पवार, संतोबा ।
आधुनिक संतासह आले शिर्डीचें बाबा ॥
या अवघ्यांनीं येऊन तुझें भजन मांडिलें।
दासगणू म्हणे उघडा आतां द्वार विठ्ठले॥



# शिरडी वृत्त

## सप्टेंबर १९५६

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं दररोज भक्तांची रीघ लागत होती. कलाकारांनीं शिर्डीस येऊन श्रीसमोर हजेरी दिली. त्यांतील कार्यक्रम पुढील-प्रमाणेंः—

**कीर्तनः**—श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव, वकील ठाणें. श्री. मराठे. सं. गवई यांचीं, श्रावण व॥ ११ श्री. देवी अहिल्याबाई पुण्यतिथीनिमित्त, श्री. गणेश-चतुर्थीप्रित्यर्थ, भाद्रपद शु॥ ११ व भाद्रपद व॥ ११ अशी पांच कीर्तनें झाली.

**प्रवचनः**—श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर मुंबई, श्री. खंडेराव त्रिलोकेकर दादर, श्री. जमखिंडे पेन्शनर ( हुबळी साईसमाजमंडळी. )

**नृत्यकलाः**—कु. नलिनी कांचन मुंबई, कु. शकुंतला साळवी मुंबई.

**पोवाडे नकलाः**—भारतीय शाहीर कला मंदिर मुंबई. श्री. शाहीर अडविलकर. श्री. एल. बी. गावडे, विनोदिनी गावडे, श्री. कानिटकर, श्री. देशपांडे, श्री. अप्पा सामंत, श्री. जनार्दन हाडकर.

**फिडल वादनः**—श्री. व्ही. रामचंद्र पुणें, श्री. वासुदेव आत्माराम किरपेकर फोटोग्राफर कऱ्हाड ( सातारा )

**गायनः**—सौ. कौसल्या मंजेश्वर मुंबई, श्री. वसंत शेलार, श्री. दलितचंद बलदोटा पुणें, श्री. शंकरराव निकम कुंडल. श्री. आर. एन. पराडकर मुंबई. श्री. प्रभाकर मालशेकर मुंबई. श्री. जयवंत कपिलेश्वरी बेळगांव. श्री. दाणी कोपरगांव. ( पुणें येथील अंधशाळेंतील विद्यार्थी यांचा संगीत गायन वादन कार्यक्रम हजेरी ) श्री दत्तात्रय नारायण सिन्नरकर नासीक, श्री. गणेश व्ही. तामसे, मुंबई.

या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यास खालील प्रमाणें देणगी आली श्री. ज्याल बाटलीवाला हुबळी रु. २१–०–० श्री. आय. जी. गोरक्षकर मुंबई रु. १०–०–० श्री. एच. पी. दस्तुर दिल्ली रु. १०–०–० श्री. मि. मनी. एच. दस्तुर मुंबई रु. २५–०–० होमी दालस मुंबई रु. १०–०–० या महिन्यात १२०० रुग्णावर उपचार करणेत आले.

## आक्टोबर १९५६

या महिन्यांत श्रीसाई दर्शनासाठीं भक्तांचीं बरीच गर्दी झाली होती. कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती पुढील प्रमाणेंः—

**कीर्तन**—ह. भ. प. हर्डीकर दिक्षित कल्याण, श्री. ह. भ. प. अंबोडकर बुवा जळगांव, श्री. श्री. बा. देव ठाणे, श्री. मराठे सं. गवई.

**प्रवचन**—श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर (सं. प्रे.) मुंबई, वादन-नकला श्री. जयसिंग भोई मुंबई, नवीन वाद्य इलेक्ट्रीकवर चालणारे, बासरी वादन, नकलांचा कार्यक्रम.

**नृत्यः**—कुमारी नंदा हत्यंगडी मुंबई.

**गायनः**—श्री. आमटेबुवा फलटण. श्री. विमल वैद्य-मुंबई, कु. कुमुद गलगले नाशिक. सौ. मालतीबाई साळवी वरळी मुंबई. श्री. गणेश राहता. श्री. माधवराव इंगळे, पुणें. श्री. बोरकर मुंबई. श्री. हिराबाई बेळगांवकर. श्री. दुलनबाई बेळगांवकर श्री. शंकरराव पोटे मुंबई. श्री. श्रीराम महादेव मराठे कोल्हापूर. श्री. रामदास मोरे, दर्यापूर उमरावती.

या महिन्यात संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यास खालील देणग्या मिळाल्या. मिसेस एच. पी. दस्तुर दिल्ली २० रु. श्री. कांतिलाल मोतिराम चोकसी मुंबई. ५१ रु., श्री. डी. आर. पटेल ग्वालीयर १०० रुपये. या महिन्यांत ११०० रुग्णावर उपचार करणेत आले.

## नोव्हेंबर १९५६

**या** महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं भक्तांची फार गर्दी झाली. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. त्यांतील कांहीं कार्यक्रम खालीलप्रमाणें:—

**कीर्तनः**—श्री. ताराबाई जोशी सिताबर्डी नागपूर. सं. गवई श्री. मराठे यांची या महिन्यांत का. शु॥ ११ का. व॥ ११ व श्री. ज्ञानेश्वर पुण्यतिथी अशी ३ कीर्तनें श्रीमंदिरांत झाली.

**नकलाः**—श्री. प्रल्हाद हरी लव्हाटे व श्री. द. आ. भिडे बोरीवली (मुंबई)

**तबला वादनः**—श्री. पांडुरंग दगडोबा साळुंके, गंज पेठ पुणें.

**गायनः**—कु. भानुमती मुर्कुटे मुंबई. कु. मालती आजगावकर मुंबई. सौ. विमल देशपांडे पंढरपूर. श्री. ललिताबाई धनवटे. कु. कुमुदिनी हाटोळकर, श्री. गणपतराव मुंबई. श्री. एल. जी. सोहनी मुंबई. श्री. टी. एस पेडणेकर, मुंबई. श्री. हरिभाऊ वाटवे पुणें. सौ. मनुबाई टिल्लू मुंबई. श्री. कमलाकर आरोंदकर मुंबई. (खांबेश्वर भजनी मंडळी) श्री. शशिकांत म्हापसेकर मुंबई. श्री. शंकरराव थरवण माटुंगा मुंबई. श्री.नरहरबुवा व्यास, कोपरगांव. सौ. विमलबाई एम धुळें. श्री. रघुवीर, धुळे.

**श्रीमंदिरांत लक्ष्मीपूजनः**—श्री. बाजरिाव तात्याजी कोते पाटील शिर्डी (सं. ट्रस्टी) व श्री. भास्करराव ढेकणे व्यवस्थापक अधिकारी साहेब यांचे हस्ते श्रीलक्ष्मी-सरस्वती-पुजन झाले व दिपवाळी निमित्त दिव्याची रोषणाई कळसावर व इतर सर्व ठिकाणीं करणेत आली. तसेच शोभेची दारू फटाके वगैरे उडविणेत आले. तसेंच संस्थानचे सर्व नोकर सेवेकरी व प्रतिष्ठित निमंत्रित मंडळी यांना दिपवाळीचा फराळ देणेत आला. व त्याच वेळेस संस्थान क्रिडा-मंडळाचें उद्‌घाटन झाले. या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यासः—श्री. गोलवाला मुंबई रुपये ११, श्री. एन. जे. आंटीया मुंबई रुपये १०१, मि. एच. पी. दस्तुर दिल्ली रु. २०, श्री. जी. एन. अणामेरा, मुंबई रु. १०१, अशी देणगी मिळाली.


यामहिन्यांत १२५० रुग्णांवर उपचार करण्यांत आले.

# श्री. साईनाथ प्रसन्न

श्रीसच्चिदानंदसद्गुरु साईबाबामहाराज मु॥ शिर्डी ता. कोपरगांव जि. अ. नगर यांचा आडतिसावा पुण्यतिथी उत्सव शके १८७८ आश्विन शु॥ १० दि. १४ आक्टोबर इ. स. १९५६ रविवार रोजीं साजरा झाला. उत्सवास मुंबई, पुणें, कल्याण, ठाणे, नासिक, हैद्राबाद, मद्रास वगैरे लांबून बरेच भक्त आले होते. उत्सवास प्रारंभ आश्विन शु॥ ९ शनिवार दिनांक १३।१०।५६ रोजीं झाला. या दिवशीं नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त दोन-प्रहरीं श्री. श्री. बा. देव (सं. ट्र.) यांचे कीर्तन, रात्रौ श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर यांचे प्रवचन झाले. दिनांक १४।१०।५६ रविवार रोजीं सकाळीं सामुदाईक अभिषेक पूजा, १० ते १२॥ पर्यंत श्री. श्री. बा. देव यांचे साईपुण्यतिथी—चरित्रावर कीर्तन, दुपारी आराधनाविधी, सायंकाळी मंत्र जागर, सिमोल्लंघन मिरवणूक, रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक व रात्रौ निरनिराळ्या कलाकारांचे गायनवादनाचे मनोरंजक कार्यक्रम झाले. दिनांक १५।१०।५६ सोमवार रोजीं सकाळीं भिक्षा, मिरवणूक, सामुदाईक अभिषेक पूजा, श्रींचे जुने कापडांचीं प्रसाद म्हणून विक्री—दोन प्रहरीं श्री. श्री. बा. देव यांचे कीर्तन, रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतुन मिरवणूक आरती. दिनांक १६।१०।५६ मंगळवार रोजी काला कीर्तन दही हंडी होऊन उत्सव समाप्त झाल्याचे जाहीर करणेत आले. उत्सवाप्रित्यर्थ शिर्डीगांवांतील मुलांनी "शेतकरी" या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. उत्सवाप्रित्यर्थ साईसंस्थान नोकरांना प्रत्येकी रुपये पांच प्रमाणे बक्षिस देणेत आले. उत्सवानिमित्त संस्थानचे अधिकारी वर्ग म्यानेजिंग ट्रस्टी, इतर ट्रस्टी, अध्यक्ष, मेंबर, ऑ. सेक्रेटरी मंडळी हजर होती. उत्सवाप्रित्यर्थ मांडव, कापडखोल्या, कापडकमानी, लतापल्लव वगैरेनीं सुशोभित केलेली होती. पोलिस बंदोबस्त होता. होमगार्ड, स्वयंसेवक पथक वगैरेनीं मदत केली. आरोग्यखात्याकडून स्वच्छता उत्तम ठेवण्यांत आली होती. सुमारें ५००० भक्त बाहेरगांवाहून आले होते.


दृष्टींतील तेज म्हणजेच जीवनाच्या उत्कर्षांतील प्रमुख अंग होय

म्हणून दिव्य दृष्टि देणाऱ्या स्वस्त आणि टिकाऊ चष्म्याला प्रमुख स्थान मिळतें.



त्याकरितां—

शिसा ऑप्टिशिअन्स

( चष्म्यांचे व्यापारी )

हें एक नांवाजलेलें दुकान आहे.

यांच्या येथें डोळयांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासले जातात.

छबीलदास रोड, दादर ( W. R. ), मुंबई २८.

१९५६ सालांत बिल्डिंग फंडासाठीं खालील प्रमाणें देणग्या मिळाल्या.

| | रु. आ. पै |
|---|---|
| मे॥ गोल्ड सोप कं. सांकली स्ट्रीट मुं. ८ | ४१४–०–० |
| श्री. जे. जे. के. पटेल, मुं. १. | ९००–०–० |
| „ एम्. यू. शुक्ल, मुं. ४ | १०१–०–० |
| „ टी. एच. ॲडव्हानी, मुं. १ | १०००–०–० |
| मिस्. जी. बी. मालवणकर मुं. १४ | १७०–०–० |
| श्री. एस. डी. अक्की विजापूर | २००–०–० |
| „ सी. जी. पटेल, कंपाला | १५१–०–० |
| „ आर. एम. वकील मुं. ६ | ५०–०–० |
| श्रीसाईभक्त, मुंबई | २००२–०–० |
| श्री. डी. डी. रासनें, पुणें | १४८–०–० |
| „ डी. एम्. व्यास, उगांडा | १२५–०–० |
| „ जी. अँटिया मुं. १ | ६८०–०–० |
| „ आर. एस. अलेकोल, मुं. १ | २२०–०–० |
| „ हिरालाल एन. पटेल, नयरोबी | १०१–०–० |
| श्री. मंघाराम नैनाराम तांजेर, | ७२–१४–० |
| „ बी. जे. पोस्टवाला, पुणें. ३, | २०३–०–० |
| „ आर. एन्. पटेल. एनडोला | १०६–०–० |
| „ व्ही. के. श्रॉफ, मुंबई, १९ | ३००–०–० |
| „ जी. एफ. देसाई, नाडियाद | ५१–०–० |
| „ भास्करभाई जमनादास एन. भाऊ मुंबई ४. | ११५१–०–० |

# साईनाथ गुरु दैवत माझे

सांईनाथ गुरु दैवत माझे।
त्रिभुवनिं ज्यांचें नामचि गाजे ॥ धृ ॥

नानांचे[१] तें पुण्य वेगळे।
उदी आरती धाडिति सबळें।
होउनि टांगेवाला वारी।
संकट नानांच्या दुहितेचे ॥ १ ॥

माधवरावावरि[२] जो प्रेमा।
ठाउक नाहीं त्याला सीमा।
गयावळाच्या सदनीं बैसुनि।
भक्तोद्धारक नामचि साजे ॥ २ ॥

लक्ष्मीव्रत[३] उद्यापन भोजनि।
बापू[४] श्यामा[५] यती होउनी।
भोजन करूनि कळून दिधले।
बाळहि[६] पश्चात्तापे लाजे ॥ ३ ॥

विनती करि श्रीपाद[७] पदांबुजिं।
उपदेशामृत सर्वां पाजी।
विचलित ना हो चित्रमदिय हे।
जिव्हा गावो नामचि तुमचे ॥ ४ ॥

---

**टीप** : (१) कै. नानासाहेब चांदोरकर, (२) कै. माधवराव देशपांडे तथा श्यामा (३) कै. बाळासाहेब देव यांच्या मातुः श्री. (४) कै, बापूसाहेब जोग, (५) कै, माधवराव देशपांडे. (६) कै. बाळासाहेव देव (७) पूज्य बाळकृष्णजानकी सुत श्रीपाद देव.

—श्रीपाद बाळकृष्ण देव

---

# तुमको लाखो प्रणाम

तुमको लाख्खो प्रणाम,
लाख्खो प्रणाम ॥ ध्रु ॥
तुम साई कहानेवाले,
तुम दत्त कहाने वाले,
गोदातीर निवासी तुमको,
शिरडी रहेनेवाले तुमको ॥
भक्तोंका सुखकारी तुमको,
भक्तोका दुखहारी तुमको ॥ १ ॥

शंकरजीका रूपही तुमहो ।
रामचंद्रका रूपही तुमहो ॥
त्रैमूर्तीका रूपही तुमहो ।
गणेशजीका रूपही तुमहो ।
नारायणका रूपही तुमहो ।
विठ्ठलजीका रूपही तुमहो ॥
तुमको लाख्खो प्रणाम ॥ २ ॥


मेरा शिर तुम चरणोपरही ।
सदैव राहे मेरी विनती ।
खास सुनोंगे आशा मेरी ।
पुकार करुंहू सांई सांई ।
तुमको लाख्खो प्रणाम ॥ ३ ॥

— जानकी-बाळकृष्ण-सुत

---

## अहमदनगर स्टेशनाहून श्री क्षेत्र शिर्डीला येणाऱ्या जाणाऱ्या बस सर्विसचें नवें वेळापत्रक

**अहमदनगर रेल्वे स्टेशन**
निघते—सकाळीं ६–५०
**शिरडी** „ „ १०–१५
**कोपरगांव स्टेशन** येते „ १०–४५
**कोपरगांव स्टेशन**
निघते—दुपारी १२–५०
**शिरडी** „ „ १३–२०
**अहमदनगर रेल्वे स्टेशन**
येते—दुपारीं ४–१५



प्रत्येक जीवात्मा हा स्वभावतः परमात्मरूप आहे. अंतर्बाह्यसृष्टीचें नियमन करून अंतस्थ परमात्मरूप व्यक्त करणें हेंच प्रत्येकाचें साध्य आहे. कर्मयोगानें, भक्तियोगानें, राजयोगानें, ज्ञानयोगानें अथवा या सर्वांच्या मदतीनें तुम्ही मुक्त व्हा. यांत सर्व धर्म आला. मतें, आचार, ग्रंथ, देवळें इत्यादि गोष्टी गौण आहेत. मुक्ति मिळविणें हेंच मुख्य साध्य आहे.

—विवेकानंद

# श्रीसाईलीलेंतील जाहिरातींचे दर

| | कव्हर पेज २ रें–३ रें | कव्हर पेज ४ थें | आंतील पान |
|---|---|---|---|
| पूर्ण पान एकाच वेळेस | रु. ६० | रु. ७५ | रु. ४० |
| अर्धे ,, ,, ,, | रु. ३५ | रु. ४० | रु. २५ |
| १/४ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १५ |
| १/८ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १० |
| पूर्ण पान एक वर्षाकरितां | रु. २०० | रु. २५० | रु. १३५ |
| अर्धे ,, ,, ,, | रु. १२० | रु. १३५ | रु. ८५ |
| १/४ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ५० |
| १/८ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ३५ |

वि. सू.:–जाहिरात देतेवेळीं ५० टक्के आगाऊ रक्कम पाठविण्याची विनंती


# MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम

व्यवस्थित करणार

## माटुंगा क्लीनिंग वर्क्स

( स्थापना १९३४ ) मालक : एस्. व्ही. प्रधान

मोदी निवास, मुंबई १९

स्थापना १९१६

लग्न, मुंजी सारख्या मंगल समारंभाचें कार्य निघालें कीं सोनें, चांदी, मोतीं व जवाहिराचे दागदागिने यांची आवश्यकता भासते. सोनें, चांदी, मोतीं व जवाहिरांचे दागिने म्हटले कीं सचोटी व प्रामाणिक व्यवहाराची खात्री असावी लागते. सचोटी व प्रामाणिकपणा या करितां – गिरगांव, ठाकुरद्वार येथील ४१ वर्षांच्या

# ई. आर. मालपेकर

यांचे विश्वासू पेढीची, लहान, मोठ्या सर्व दर्जाच्या माणसांना आठवण होते व तेथें जाऊन बिनधोक खरेदी केली जाते. अद्याप आपण आमच्या पेढीवर आलां नसाल तर येऊन एकदां अनुभव घ्या.

## तुमचें खात्रीनें समाधान होईल

वि. सूचना— सोनें १०० व ९७ ।-, ॥-, १, ५ तोळे लगडी तयार मिळेल

धनतेरसकरितां धन म्हणून पुजण्याकरितां जुनीं दुर्मिळ चांदीचीं नाणीं आमचेकडे मिळतील.

पत्ता : ई. आर. मालपेकर
जितेकर चाळ
मुंबई २

# MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम

व्यवस्थित करणार

## माटुंगा क्लीनिंग वर्क्स

( स्थापना १९३४ ) मालक : एस्. व्ही. प्रधान

मोदी निवास, मुंबई १९


## श्रीसाईलीलेंतील जाहिरातींचे दर

| | कव्हर पेज २ रें–३ रें | कव्हर पेज ४ थें | आंतील पान |
|---|---|---|---|
| पूर्ण पान एकाच वेळेस | रु. ६० | रु. ७५ | रु. ४० |
| अर्धे ,, ,, ,, | रु. ३५ | रु. ४० | रु. २५ |
| ¼ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १५ |
| ⅛ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १० |
| पूर्ण पान एक वर्षाकरितां | रु. २०० | रु. २५० | रु. १३५ |
| अर्धे ,, ,, ,, | रु. १२० | रु. १३५ | रु. ८५ |
| ¼ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ५० |
| ⅛ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ३५ |

वि. सू.:—जाहिरात देतेवेळीं ५० टक्के आगाऊ रकम पाठविण्याची विनंती



# श्री साई लीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

वर्ष ३४ वें : अंक ३ रा

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट.ख.सह)

जुलै—ऑगस्ट—सप्टेंबर १९५७

संपादक—

नागेश आत्माराम सावंत


रामचंद्र महादेव राणे

कार्यालय—

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,

४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १


## श्री साईवाक्सुधा



★

करितां माझियां कथांचें श्रवण ।
तयांचें कीर्तन आणि चिंतन ।
होईल मद्भक्तीचें जनन ।
अविद्या—निरसन रोकडें ॥

—श्री साईसच्चरित अ. २



# अनुक्रमणिका


| विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| श्रीसाई वाक्सुधा | | ४ |
| प्रिय वाचक | संपादक | ५ |
| पद साईचें वंदावें | बाबांच्या बाळाचें बाळ | ६ |
| बाबांची लीला | | ७ |
| श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव | | ९ |
| श्री ज्ञानेश्वर जीवन | वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर | ११ |
| तूं साई आमुची माई | श्रीदासगणूमहाराज | १५ |
| श्री साईबाबांची शिकवण | ना. वा. गुणाजी | १७ |
| श्री रामकृष्ण आणि विद्यासागर | | २८ |
| आपले निश्चय | द. पां. खां. | ३८ |
| भावनेला किंमत आहे | विनोबा | ४८ |
| सुश्लोकगीता | वि. के. छत्रे | ४९ |
| शब्दांचा महिमा | आचार्य विनोबा भावे | ५४ |
| वंशश्रेष्ठत्व आणि वर्णश्रेष्ठत्व | | ६१ |
| अन्वययोग व व्यतिरेकयोग | ग. ल. रेगे | ६७ |
| भक्त मंडळाचे सभासद | | ७३ |
| श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या | | ७४ |
| श्रीसाईस्तवनाष्टक | शां. बा. दाते | ७७ |
| शिरडी वृत्त | | ७८ |

## प्रिय वाचक—

श्रीसाईलीलेचा चालू अंक हा पुण्यतिथि विशेषांक आहे. विविधता आणि वाचनीयता या दोन्ही दृष्टींनीं हा अंक वाचकांना आवडावा. यांतील कांहीं विशेष लेखांकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. श्री. ना. वा. गुणाजी यांनीं गुरु आणि गुरुकृपा यांविषयीं श्रीसाईबाबांची शिकवण कशी होती, याचें सुबोध आणि सयुक्तिक विवेचन आपल्या लेखांत केलें आहे. आध्यात्मिक विषयांसंबंधीं श्री. गुणाजी यांचा दीर्घकालचा सखोल व्यासंग आहे. या व्यासंगाचें प्रतिबिंब प्रस्तुत लेखांत उमटलें असल्याचें वाचकांना आढळून येईल.

संस्कृत भाषेंतील शब्द—सामर्थ्या विषयीं आचार्य विनोबा भावे यांनीं केलेलें विवेचन वाचकांना अपूर्व आणि मननीय वाटेल. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्याशीं श्री रामकृष्ण परमहंस यांचा झालेला संवाद 'एम्.' यांच्या ग्रंथावरून श्री. मंडणमिश्र यांनीं अनुवादित केला आहे. हा अनुवाद वाचकांना अत्यंत आकर्षक व उद्‌बोधक वाटेल. आपले निश्चय कां फसतात आणि केव्हां साधतात, या विषयावर मानसशास्त्रीय विवेचन असलेला प्रस्तुत अंकांतील लेख वाचकांच्या विचारांना खास चालना देईल. प्रस्तुत अंकांतील प्रत्येक पृष्ठ वाचनिय करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. अंकाच्या एकंदर अंतरंगासंबंधी वाचकांनीं आपलें मत आम्हांला कळविल्यास आम्ही आभारी होऊं. श्री साईलीला महाराष्ट्रांत घरोघर पोंचावी अशी आमची मनीषा आहे. या दृष्टीनें वाचकांच्या अपेक्षा आणि त्रैमासिकाच्या चालू स्वरूपाबद्दलच्या त्यांच्या प्रतिक्रिया समजल्या तर त्या आम्हांला खचित मार्गदर्शक ठरतील.

× × ×

शिर्डी येथील इस्पितळ तेथें येणाऱ्या भक्तांच्या आणि तेथील जनतेच्या सेवेसाठीं अद्ययावत् आणि सुसज्ज करण्याचा शिर्डी संस्थानचा प्रयत्न आहे. इस्पितळासाठीं भक्तांकडून देणग्या मिळत आहेत. त्यांची यादी इतरत्र या अंकीं दिलीच आहे. या देणग्या वाढल्या तर रुग्ण—सेवा करण्याचें संस्थानचें सामर्थ्यहि वाढणार आहे. म्हणून या सुयोग्य कार्याकडे दात्या भक्तांनीं लक्ष पुरवावें अशी आम्ही विनंती करतों.

× × ×

साईभक्तीच्या प्रसाराबरोबर भाविकांच्या भोळ्या भावनेचा फायदा लुटणारे लोकहि वाढूं लागले असल्याचें अलीकडे आढळून येऊं लागले आहे. आपण साईबाबांचा अवतार आहोंत असें सांगून भक्तांना फसविणाऱ्या समाजकंटकांच्या कारवायांच्या कथा वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. खुद्द साईबाबांनीं

आपला वेगळा संप्रदाय निर्माण केला नव्हता. त्यांची भक्ति करण्यासाठीं मध्यस्थाची गरज नाहीं. साईबाबांच्या नांवावर आपली तुंबडी भरून घेणाऱ्या धूर्तांपासून भक्तांनीं सावध राहावें आणि त्यांच्या जाळ्यांत सांपडून स्वतःची दिशाभूल होऊं देऊं नये, असें आम्हांला कटाक्षानें सांगावेंसें वाटतें.

× × ×

केवळ धार्मिक विषयांना वाहिलेलें नियतकालिक चालविणें ही गोष्ट सध्यांच्या युगांत अत्यंत कठीण आहे. अशीं नियतकालिकें थोडा काळ चालून जनतेच्या आश्रयाच्या अभावीं बंद पडलीं असल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. असें असतांना केवळ या विषयाच्या आस्थेनें असें धार्मिक नियतकालिक चालू करण्याचें जे साहस करतात त्यांचें अवश्य कौतुक केलें पाहिजे. श्री. 'साधुदास' यांनीं 'प्रेमानंद' या नांवाचें मासिक यंदांच्या एप्रिल महिन्यापासून चालू केलें आहे. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेले या मासिकाचे अंक पाहतां साधकांना हें मासिक संग्राह्य असेंच वाटेल यांत शंका नाहीं. 'साईसुमन' नांवाचें एक गुजराती मासिक आज कांहीं वर्षें चालू आहे तेंहि वाचक-भक्तांना वाचनीय व संग्राह्य वाटेल. सत्संग हा आपल्याला आपल्या इच्छेप्रमाणें हवा तेव्हां उपलब्ध असत नाहीं. पण सत्संगानें होणारा लाभ, संतांचे विचार आपल्याला उपलब्ध करून देणाऱ्या अशा नियतकालिकांतून कांहीं प्रमाणांत मिळूं शकतो. या दृष्टीनें प्रेमानंद (मराठी) आणि साईसुमन (गुजराती) या मासिकांचें आम्ही स्वागत करतों आणि भक्तजन-हृदयांत त्यांना स्थान मिळावें असें अंतःकरणापासून इच्छितों.

संपादक { ना. आ. सावंत
रा. म. राणे }

---

## पद साईचें वंदावें

पद, सांईचें वंदावें।
नाम, सांईचे ते गावें ॥ ध्रु ॥

सांई आहे अंतर्ज्ञानी।
त्यांसी गावें हो कीर्तनीं।
काव्य चरणीं वहावें ॥ १ ॥

गोदा प्रक्षाली चरण।
मशिद भूषवी आसन।
धुनी ती प्रखरचि राहे ॥ २ ॥

निंब फांदीं गोड होई।
ज्ञान दीक्षा तेथें दिली।
स्थाना गुरुच्या नमावें ॥ ३ ॥

—बाबांच्या बाळाचें बाळ




**श्री. द. शं. टिपणीस, ठाणें, हे लिहितात—**

श्रीसाईसत्‌चरित्रांत बाबांच्या अनेक लीलांचें वर्णन आहे. बहुतेक भक्तांचें संकट वा अडीअडचणी दूर करण्यासाठीं किंवा त्यांना कांहीं पारमार्थिक तत्त्व शिकविण्यासाठीं झालेल्या आहेत. बाबा हे वरून उग्र दिसले तरी आंतून अत्यंत कोमल अंतःकरणाचे होते. श्री. चांदोरकरांच्या मुलीच्या बाबतींत त्यांनीं केलेला चमत्कार तर अलौकिकच आहे. परंतु सडकेची माती उदी म्हणून बाबांचें नांव घेऊन निष्ठेनें लावल्यावर सुखरूप सुटका झाल्याचा साईचरित्रांतील दाखला तितकाच अलौकिक व बाबांचें सामर्थ्य दाखविणारा आहे. अडलेल्या स्त्रियांची सुटका करण्याचें उदीचें सामर्थ्य वेळोवेळीं प्रगट झालें आहे. अडलेल्या स्त्रीनें मदतीसाठीं निष्ठेनें बाबांना हांक मारली कीं बाबांनीं तत्काळ धांवत येऊन त्या स्त्रीचें कल्याण करावें ही गोष्ट अजूनही होणाऱ्या घटनांमधून व्यक्त होत असते. अशाच ताज्या लीलांपैकीं पुढील एक आहे.

ही घटना या वर्षाच्या एप्रिल महिन्यांत घडलेली आहे. यंदा रामजन्मोत्सव करावा असें कांहीं भक्तांच्या मनांत आलें. हा उत्सव माझे घरीं करण्याचें ठरलें. आठ दिवस श्रीसाईसत्‌चरित्राचें सामुदायिक पारायण, कीर्तनें, प्रवचनें, भजनें असा कार्यक्रम झाला. पहिल्या दिवशीं शिर्डी संस्थानचे विश्वस्त श्री. देव वकील, ठाणें, यांचें कीर्तन होतें. पुढील घटनेची सुरवात या वेळीं झाली.

आमच्या शेजारीं डॉ. भागवत यांचें सूतिकागृह आहे. तेथील सिस्टर सामुदायिक पारायणास येत असत. श्री. देवांच्या कीर्तनास त्या हजर होत्या. त्यांच्या भाचीला दिवस गेले होते. रामनवमीच्या सुमारास प्रसूतिकाल होता. सूतिकागृहांत येणाऱ्या सर्व केसिसची जबाबदारी अंगावर असल्यामुळें व कोणती केस केव्हां येईल याचा नेम नसल्यामुळें आपल्या हातून सर्व पारायण पार पडेल कीं नाहीं याची सिस्टरना धाकधूक होती. परंतु बाबांनीं त्यांची इच्छा सफळ केली. पारायणाच्या काळांत एकही केस आली नाहीं. भाचीचे दिवस भरत आल्यामुळें त्यांना काळजी लागली होती. लग्नानंतर १४ वर्षांनीं माता होण्याचा योग भाचीस आला होता. कांहीं अंतर्गत दोषामुळें एकंदर काम कठीण जाईल व दोन्ही जीव हातीं लागणें अशक्य वाटतें असें डॉक्टरांचें मत होतें. स्वतः सिस्टर, त्यांची भाची व तिचे वडील सर्वच

काळजींत होते. श्री. देवांच्या कीर्तनास ही सर्व मंडळी होती.


श्री. देव यांचें भक्तिरसाचें गायन रंगांत आलें असतां सिस्टर बाबांना बोलून गेल्या कीं जर माझ्या भाचीची सुखरूप सुटका होऊन बाळ बाळंतिणीचे जीव हातीं लागले तर देवा, याच देवाचें कीर्तन मी येथें करवीन. त्यांनीं केलेला नवस अर्थात् कोणासही माहीत नव्हता बाईची बाबावर श्रद्धा होती. अजाण अशी विचारी भाची जसजसे दिवस भरूं लागले तसतशीं अधिकाधिक घाबरूं लागली. पहिल्या दिवशीं कीर्तनास भाचीही आली होती. ती रोज बाबांच्या दर्शनास येत असे व उदी लावून जात असे. तिचें घर सुमारें १। मैलावर असतांनाही व तिची परिस्थिति कठीण असतांनाहीं ती रोज चालत येई व चालत जाई. शिरडीचे साईबाबाच आपले पाठीराखे आहेत अशी तिची दृढ भावना होती. उत्सव संपला.

हनुमानजयंतीचा दिवस. सकाळीं ८॥ वाजतां सदरहू भाची दवाखान्यांत आली. आदल्याच दिवशीं आमच्याकडे शिरडीहून उदी आली होती, त्यांतील उदी माझ्या पत्नीनें सिस्टरच्या स्वाधीन केली. उदी पाण्यांत टाकून तिला पाजण्यांत आली. २॥–३ तास झाले, पण मुक्तता होईना. ११॥ च्या सुमारास मुंबईहून सर्जन आले व ऑपरेशन करण्याचें ठरलें.

आम्हीं शेजारींच राहत असल्यामुळें या सर्व हालचाली आम्हांस कळत होत्या. १२। च्या सुमारास आम्हीं जेवावयास बसलों. आमच्या स्वयंपाक घराच्या शेजारीं ऑपरेशन रूम येते. सुमारें १२–२० ला माझ्या पत्नीस एकाएकीं अत्तराचा घमघमाट आला. तिनें ही गोष्ट मला सांगितली. मला मात्र कसलाच वास आला नव्हता. असेल कदाचित्, बाबाच स्वतः फेरी मारून गेले असतील, एवढेंच मी म्हणालों. माझें जेवण झालें व पांच एक मिनिटांत खोली मधून नूतन बालकाच्या रुदनाचा आवाज आला. माझा मुलगा लगेच धांवत गेला व चौकशीं अंतीं कळलें कीं सुखरूप सुटका झाली. हनुमान जयंतीस मारुतीरायच जन्मास आले. यामुळें सिस्टरला व मुलीच्या वडिलांना किती आनंद झाला असेल तें सांगणें नकोच. मागाहून कळलें कीं १२–१० ला ऑपरेशनची सुरवात झाली व १२–४० ला सुटका झाली. याच दरम्यान बाबांच्या फेरीचे दर्शक असे सुवास आले.


कबूल केल्याप्रमाणें नवस लगेच फेडण्यांत आला. अकराव्या दिवशीं म्हणजे २४ एप्रिल रोजीं श्री देव वकील ठाणें यांच्या हस्तें श्रीबाबांची व सत्यनारायणाची पूजा मुलीच्या वडिलांनीं करवून घेतली. उत्सवांत होती तशीच आरास करण्यांत आली रात्रीं श्री. देव वकील, ठाणें, यांचें कीर्तन झालें व कीर्तनानंतर कॉफीपान झालें या घटनेशीं संबंध आलेल्या सर्व माणसांची बाबावर अत्यंत श्रद्धा बसली आहे. श्रीसद्गुरुंच्या कृपेनें बाळ बाळंतीण खुशाल आसून त्या कुटुंबांत आनंद आहे.

## गुरुपौर्णिमा महोत्सवांतील हरिकीर्तन




श्री. एल्. बी. पाटकर, श्री प्रसन्ना स्टुडियो, यांच्या सौजन्यानें

# गुरुपौर्णिमा महोत्सवांत श्रींच्या रथाची मिरवणूक




श्री. एल्. बी. पाटकर, श्री प्रसन्न स्टूडियो, यांच्या सौजन्यानें

# यंदांचा श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज मु. शिरडी. ता. कोपरगांव जि. अहमदनगर येथील गुरु पौर्णिमा उत्सव सालाबाद प्रमाणें यंदाही मि. आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १८७९ गुरुवार माहे जुलै दि. ११ इ. स. १९५७ या दिवशीं श्रीचे मंदिरांत साजरा झाला. उत्सवास प्रारंभ बुधवार दि. १०–७–५७ रोजीं होऊन शुक्रवार दि. १२–७–५७ रोजीं तो समाप्त झाला. शीतज्वराच्या सांथीमुळें उत्सवास यंदा बाहेरगांवच्या भक्त मंडळीची गर्दी नेहमी पेक्षां थोडी कमी प्रमाणांत होती.

उत्सवाचा प्रारंभ बुधवार दि. १०-७-५७ रोजीं सकाळीं काकड आरती पासून झाला. ह्या दिवशीं नेहमीच्या कार्यक्रमा व्यतिरिक्त अभिषेक व मुंबई येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. दासबुवा परुळेकर यांचें सुश्राव्य कीर्तन दुपारीं ४ ते ७ पर्यंत झालें. रात्रौ श्रीच्या पालखीची गांवांतून मिरवणूक तदनंतर कलाकारांच्या गायनांची हजेरी झाल्यावर नित्याप्रमाणें शेजआरती होऊन ह्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

गुरुवार दि. ११–७–५७ गुरु पौर्णिमेचा दिवस असल्यामुळें पहांटे ५ वाजतां श्रीच्या काकड आरतीस सुरवात झाली. नंतर श्रीचे समाधीस सुमधुर वाद्यांच्या गजरांत मंगल स्नान घालण्यांत आलें. व नंतर नेहमीप्रमाणें पूजाअर्चा होऊन सामुदायिक अभिषेकास प्रारंभ झाला. त्यानंतर ह. भ. प. दासबुवा परुळेकर, मुंबई यांचें कीर्तन दुपारीं १२॥ पर्यंत होऊन नंतर श्रीची माध्यान्ह आरती झाली. दुपारीं ३॥ ते ५॥ श्रीयुत श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव यांचें 'श्रीगुरुपौर्णिमा' या विषयावर प्रवचन झालें. नंतर ह. भ. प. रामचंद्र बुवा भोगावते, अमळनेर (पू. खा.) यांचें कीर्तन व सौ. शोभनाबाई भोगावते यांचें ओव्या गायन झालें. रात्रौ ९ वाजतां श्रीचे रथाची मिरवणूक असंख्य भक्त जनांच्या मेळाव्यांत गावांतून वाजत काढण्यांत आली. त्यावेळीं शोभेच्या दारूचें सामान लावण्यांत आलें होतें. ह्या मिरवणुकीचें वेळीं भारूड भजन पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर यांनीं केलें.

या दिवशीं सबंध रात्र बाबांचें जागरण असल्यामुळें रात्रभर निरनिराळ्या खालील कलाकारांनीं दुसऱ्या दिवशीं पहांटे ६ वाजेपर्यंत श्रीच्या समोर हजेरी देऊन हा समारंभ साजरा केला. श्री. एस. एम्. आकेरकर, मुंबई (अभंग) श्रीमती नलिनीबाई पी. रांगणेकर, मुंबई. (भक्तिगीत) श्री. जिजाबा, शिरडी, (भक्तिगीत) श्री. श्रीराम सावर्डेकर, मुंबई (भक्तिगीत) श्री. विठ्ठलराव मांजरेकर, शिरडी. (भक्तिगीत) श्री. रामचंद्र हरी तांबे, रत्नागिरी, (गायन) श्री. श्रीपाद

बाळकृष्ण देव, ठाणें (भक्तिगीत) श्री. लक्ष्मणराव राऊत, अहमदनगर (सनई-वादन) श्री. दत्तोबा दामोदर बिडवे, पुणें (स्पेशल तबला) श्री. दत्तोबा गुरव, शिरडी (पेटीवादन) श्री. धरमचंद मारवाडी. पुणें. (तबलावादन) श्री. रामचंद्र जर्नादल काळे. अहमदनगर (भक्तिगीत) श्री. एकनाथ-राव तुपे, कोपरगांव, (भक्तिगीत) श्री. दत्तोपंत जोशी, बेलापूर, (भक्तिगीत) श्री. वसंतराव बाबुराव देवालणेकर, पुणें. (सनईवादन.) श्री. सदाशिव सखाराम पुजारी, नासिक, (तबला वादन) श्री. शंकर पांडुरंग तुपे, कोपरगांव, (सनई वादन.) श्री. गणपतराव खेडकर, पुणें, (सनई वादन) श्री. शंकरराव बाबुराव नगरकर, पुणें. (सनई वादन) श्री. पांडु-रंग व्ही. कदम, बेलापूर, (तबलावादन) श्री. दामूअण्णा एम. दळवी, श्रीरामपूर. (सनई वादन) श्रीमती माईसाहेब शिरोडकर, मुंबई. (भक्तिगीत) वरील सर्व कलाकारांना श्रीसाई संस्थान तर्फे श्रीचा आशीर्वाद म्हणून श्रीफल व एक रुपया प्रत्येकीं प्रसाद म्हणून देण्यांत आला.

शुक्रवार दि. १२–७–५७ रोजीं श्रीच्या स्नानानंतर पूजा अर्चा होऊन सामुदायिक अभिषेक झाला. नंतर संस्थान गवई श्री. विठलराव मराठे, यांचें गोपाळ काला कीर्तन झालें आणि दही–हंडी खेळ फुगड्या वगैरे कार्यक्रम होऊन श्रीची माध्यान्ह आरती तीर्थ प्रसाद वगैरे झाल्या वर उत्सव समाप्त झाला.

उत्सवांत तीन दिवस श्रीचे समाधीस अर्पण केलेल्या जुन्या कपड्यांची, भक्तांना प्रसाद म्हणून विक्री करण्यांत आली.

उत्सवांत पताका, तोरणें व विजेच्या दिव्यांची रोषणाई वगैरे करण्यांत आली होती. तसेंच स्वच्छता खात्या मार्फत सर्व जागीं डी. डी. टी. फवारे मारून सर्व खोल्या साफ करण्यांत आल्या होत्या. पोलीस, होमगार्ड, स्वयंसेवक यानी उत्कृष्ट बंदोबस्त ठेवला होता. पोलीस अधिकारी श्री. स्कॉट व श्री. थोरात हे स्वतः दक्षतेनें देखरेख ठेवीत होते.

उत्सवांत संस्थान कमिटीचें अध्यक्ष, ट्रस्टी, सन्मा. चिटणीस, सन्मा. खजिन-दार, सदस्य, उत्सव समिती व संस्थानां-तील सर्व दर्जाच्या नोकरवर्गानें मेहनत घेऊन तीन दिवस सर्व कार्यक्रम योग्य प्रकारें साजरे करण्यांस मदत केली, हें नमूद करण्यास आनंद होतो उत्सवा-प्रीत्यर्थ येणाऱ्या भक्तगणांची सोय एस. टी. ने जास्त गाड्या सोडून उत्तम प्रकारें केली होती. ह्या उत्सवांत, वृद्धपणामुळें सेवानिवृत्त झालेल्या ४ संस्थान नोकरांस रोख रुपये (मानधन) व कापड देऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला. याप्रमाणें श्रीगुरु पौर्णिमा उत्सव फारच उत्तम रीतीनें पार पडला.

**रा. म. राणे**
स. चिटणीस उत्सव समिति



श्री ज्ञानेश्वर-जीवन

# अलकापुरींत देवांचे अवतार

कै. वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर

## प्रकरण ४ थें

'इतिहासाच्या अभावामुळें एकंदर राष्ट्राविषयींची जुनी माहिती जशी अगदीं बुडाली, त्या प्रमाणेंच चरित्रांच्या अभावीं प्राचीनकाळीं होऊन गेलेल्या महान् महान् पुरुषांचें वृत्तहि केव्हांच समूळ नष्ट होऊन गेलें आहे. आतां 'शंकर विजय' 'ललित विस्तार' 'भोज प्रबंध' वगैरे कांहीं ग्रंथ संस्कृतांत व मराठींत 'भक्तिविजय' 'संत लीलामृत' अशा सारखे देशांत कांहीं आहेत खरे; पण पुराणांत व इतिहासांत जितकें अंतर तितकेंच वरील ग्रंथांत व खऱ्या चरित्रांत.' (कै. विष्णुपंत चिपळूणकर ह्यांची निबंधमाला पान ६५१).

ज्ञानेश्वरांचें चरित्र वरील मालाकारांचें जे मत उद्धृत केलें आहे, त्याप्रमाणें जवळ जवळ दंतकथावजा किंवा पुराणवजा आहे. पण ह्या दंतकथांतूनच इतिहासाची निर्मिति करण्याच्या प्रयत्न केला पाहिजे. न्या. रानडे ह्यांनीं दंतकथातूनच ज्ञानेश्वर हे त्या काळचे बंडखोर ल्यूथर होते, त्यांनीं त्या काळच्या ब्राह्मणधर्माविरुद्ध बंड पुकारून भागवत धर्म किंवा पर्यायानें वारकरी धर्म असें नांव पडलेल्या सगुण भक्ति सांप्रदायांतील भक्ताच्या व्यष्टि धर्मांचा प्रसार स्वतः आचरून एक जात साऱ्या जनतेचा उद्धार केला, हें सिद्ध केलें. किंबहुना त्यांनीं भाषा आणि धर्म ह्यांच्याद्वारें महाराष्ट्राचें एकीकरण केले म्हणूनच तीनशें वर्षांनंतर रामदासांना महाराष्ट्र धर्म कोणता हें ओळखतां आले व 'मराठा तेवढा मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।' हा उपदेश संभाजीस करतां आला. हीं सारीं ऐतिहासिक सत्यें न्या. रानड्यांनी ज्ञानेश्वरांच्या दंतकथावजा चरित्रांतूनच हुडकून काढलीं. लो. टिळकांनीसुद्धां ज्ञानेश्वरानें पंढरपूर ते आळंदीपर्यंत धर्म आणि भाषा ही दोन केंद्रे रोखून ठेवली म्हणूनच पुढें शिवाजी, रामदासांना आपल्या स्वराज्य प्राप्तीचें कार्य महाराष्ट्राच्या सीमा ओळखून करतां आलें, असें आपलें स्पष्ट मत दिलें. हा मुद्दा माझ्या प्रबंधांत अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें न्यायमूर्ति रानडे व लोकमान्य टिळक ह्यांच्या मतांचा उल्लेख मी बुद्धिपुरःसर पुन्हां पुन्हां केलेला आहे. पण हें ऐतिहासिक सत्य लो. टिळकांनीसुद्धां ज्ञानेश्वरांच्या दंतकथा-

वजा चारित्रांतूनच शोधून काढलें आहे. ज्ञानेश्वरांचें चरित्र आजवर बऱ्याच लोकांनीं केलें आहे. त्या चरित्रांत नुसता सांगाडाच असून त्यांत प्राण किंवा जिवंतपणाची जोड देण्याचें काम कोणी केले नाहीं. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं भावंडे अवतारी खरीं पण देहाच्या उपाधींतले सारे मानवी धर्म त्यांच्यांत असणें व ते तसे दाखविणें म्हणजेच त्यांच्या आजपर्यंतच्या उपलब्ध चरित्रांच्या दंतकथावजा सांगाड्यांत प्राण भरणें होय. पण हें कार्य नितांत उसळत्या कल्पनेचें आहे. पण ही उसळती कल्पना त्या दंतकथावजा चरित्राच्या सांगाड्यांत नीट बसेल अशीच असली पाहिजे. हा नाजूक भेद पाळला नाहीं तर from sublime to ridiculous असा प्रकारही होण्याचा संभव आहे व त्यामुळें त्या चरित्रांची कल्पित कादंवरी करण्यासारखा हास्यास्पद प्रकार ठरला जाईल. हे सारे खांचखळगे संभाळून हें चरित्र लिहिण्याचा मी प्रयत्न करीत आहे. त्यांत मला कितपत यश आले हे ठरविणें वाचकांचें काम आहे, पण मनांत पुन्हा एकदा असा विचार येतो कीं, आपण प्रयत्न तर करून पहावा. माझ्या ह्या कार्यानें स्फूर्ति होऊन माझ्यापेक्षां एखादा यशस्वी लेखक हें कार्य हातीं घेईल ह्या सदिच्छेनेंच केवळ मी हें [illegible]खाण करीत आहें.

ज्ञानदेवाच्या चरित्रांचें मुख्य साधन म्हणजे नामदेवाचे आदि तीर्थावळी व समाधीचे अभंग होत. ह्या साधनांवरूनच महिपति, निरंजन, माधवादिकांनीं आपापलीं ज्ञानदेव चरित्रें रचिली आहेत. ही सारी चरित्रें एका भक्ताचे भूमिकेवरच उभारलेली आहेत व त्यामुळें त्यांत भक्ति, अतिशयोक्ति व चमत्कार ह्यांची रेलचेल सांपडते. अर्थात् हीं सारीं चरित्रें निबंधमालाकार चिपळूणकरांच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे जवळ जवळ पुराणवजाच आहेत नामदेवाचे आदींतले

**Your life is worth-living.**
**Only if you can face it with Confidence.**
**Know its trends and make it a Succces.**
**Expert consultation at moderate terms by**
**Previous apporntment, only available from**

## G. M. Bhiwankar


Palmist & Astrologer Near Electric Power House
1st Road, Khar **Bombay 21**
On Saturdays 3 p. m. to 5-30 p. m.
On Sundays & Bank Holidays
9 A. M. to 12 & 2-30 to 5-30 P. M.
All correspondence covering reply should reach before any **Wednesday.**

अभंग विश्वसनीय वाटत नाहींत. त्या अभंगांत ज्ञानदेवाच्या तोंडीं निवृत्तीनाथांना उपदेश म्हणून नामदेवाच्या नांवावर जे अभंग आहेत ते खास घुसडलेले आहेत. सबंध ज्ञानेश्वरींत जागजागीं ज्ञानदेवानें आपल्या सद्‌गुरू निवृत्तीबद्दल जे विनयपूर्ण उद्‌गार काढलेले आहेत त्यावरून पाहतां ‘अविधि आचरण परम दूषण। वेदो नारायण बोलियेला। तसेंच कुळचा कुळधर्म अवश्य पाळावा। सर्वथा न करावा अनाचार।’ असा उर्मटपणाचा उपदेश आपल्या सद्‌गुरूला करण्याचा मूर्खपणा ज्ञानदेव करतील हें शक्यच नाहीं. नामदेवाच्या आदींतले अभंग नामदेव ह्यांचा परिचय होण्याच्या आधींचे असल्यामुळें त्यांत इतिहासापेक्षां विकल्पनाच जास्त आहेत असें दिसतें. एकंदरींत, तत्कालीन विश्वसनीय अशा ऐतिहासिक माहितीच्या अभावीं आज ज्ञानदेवाच्या चरित्रासंबंधी वाटेल त्या विद्वानानें आपल्या बुद्धीच्या जोरावर वाटेल ते तर्क व अनुमानें करावीं असा प्रसंग गुदरला आहे. ह्याचा एक नमुना म्हणून ज्ञानेश्वरांनी आजुबाजूची निराशेची परिस्थिति पाहून आत्महत्या केली, अशा आशयाचें डॉ. पेंडसे ह्यांनीं केलेलें विधान होय. अशा परिस्थितींत ज्ञानदेवाच्या चरित्रावर व त्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारें अगदीं विश्वसनीय ऐतिहासिक साधन म्हटलें म्हणजे त्यांनी लिहिलेली ‘**ज्ञानेश्वरी**’ होय. त्या ‘ज्ञानेश्वरींत’ ग्रंथांवरून त्यांच्या चरित्राची जेवढी माहिती मिळेल तेवढीच सध्याच्या परिस्थितींत विश्वसनीय म्हणून मानणें श्रेयस्कर होय. ही माहिती ज्ञानेश्वरींतील ओव्यांच्या आधारानें व शक्याशक्यतेच्या कोटींत येतील अशा अनुमान पद्धतीवरच करणें, हें एकच आतां उपलब्ध साधन आहे. ह्या साधनाच्या जोरावरच ह्यापुढें ज्ञानेश्वरांच्या चरित्रावर अधिक प्रकाश पाडण्याचा ह्यापुढें प्रयत्न झाला पाहिजे.

द्विजीं घातलें वाळित। आप्तवर्गीं सांडिलें त्वरित॥ अशा परिस्थितींत विठ्ठलपंत आणि रखुमाई ह्यांनीं बारा वर्षें काढलीं. त्यांचें तप पूर्ण झालें आणि ह्यानंतर दोन दोन वर्षांच्या अंतरानें त्यांना निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशी चार नक्षत्रासारखीं मुलें झालीं. चांगले दिवस भरकन् जातात पण वाईट दिवस जातां जात नाहींत. विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांना पहिली बारा वर्षें युगाप्रमाणें गेली. पण ही चार मुलें झाल्यानंतर मात्र त्या मुलांच्या लडिवाळ संगतींत हां हां म्हणतां काळ कसा गेला तो समजला नाहीं. मुलें जसजशीं मोठी होऊं लागलीं तसतशी त्या मुलांनाही ब्राह्मणांच्या जाचाची आंच बसूं लागली. ब्राह्मणांची मुलें त्याच्या वाऱ्यासही उभीं राहात नसत. केव्हां केव्हां ब्राह्मणाच्या मुलांनीं त्यांची उघड उघड चेष्टा व टर उडवावी. आठ वर्षांचे निवृत्ति व सहा वर्षांचे ज्ञानेश्वर ह्यांनीं घरांत आईकडे कागाळी करावी ‘हीं मुलें आमचीच कां चेष्टा करतात?’ ‘आई, संन्याशाचा पोरें म्हणजे ग काय?’ असे प्रश्न करून त्यांनीं आईबापांना भंडावून सोडायचें. ज्ञानेश्वरांचें आईवर विशेष प्रेम होतें. केव्हां केव्हां रखुमाईनें ‘ज्ञानेश तूं असा त्रास दिलास तर मी निघून जाईन हं’ अशी नाकासमोर बोट

धरून घमकी द्यावी. त्याबरोबर ज्ञानेश्वरानें आईच्या कंबरेला विळखा घालून तिला प्रेमानें घट्ट धरावें, केव्हां केव्हां आपल्या मुलांना होत असलेला जाच पाहून मुलें घरांत नसली कीं विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांच्या गोष्टी चालत, ह्या गोष्टींच्या भरांत रखुमाईच्या डोळ्यांत अश्रु यायचे. इतक्यांत मुलानीं घरांत यावें व आईच्या डोळ्यांतील अश्रु पाहून ज्ञानेश्वरांनें 'आई तूं कां रडतेस ग ?' असा प्रश्न करावा व ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ह्यांनीं चटकन् आईला बिलगून धरावें, असे अनेक प्रकार चालावयाचे. कुळंब्याच्या घरांत हीं चारही मुलें अत्यंत आवडीचीं झालीं. दगड्या, धोंड्या, बांक्या, भागू असा खालच्या समाजांतील त्यांच्या मित्रांचा परिवार वाढत चालला. एकदां रखुमाईनें 'ज्ञानेश काय रे ! सारा दिवस कुळंब्याच्या मुलांत फिरतोस ! असें म्हटलें त्यावर 'आई कुळंब्याचीं मुलं झाला तरी देवाचींच लेंकरं ना ?' असें पोक्त उत्तर लडिवाळपणें द्यावें. चार मुलांत वक्तृत्व ज्ञानेश्वरांच्या अंगीं उत्तम होतें. निवृत्ति, ज्ञानदेव ह्यांना विठ्ठलपंतानी सर्व ग्रंथ पढविले. तो स्वतः व्युत्पन्न होता. त्यामुळें ज्ञानेश्वरींत उतरलेली सर्व व्युत्पन्नता त्यांना व निवृत्तींना वडिलांकडूनच मिळाली होती. वडिलांकडून मिळालेल्या ज्ञानाचा मराठींत अनुवाद करून रोज कुळंब्याच्या माळ्यांच्या परिवारांत सांगावा. ह्यामुळें त्या समाजांतील तरुण वृद्ध साऱ्या स्त्री पुरुषांचा घोळका ह्या चार मुलां भोंवती जमू लागला. ह्या आनंदांत त्या चार मुलांना देखील ब्राह्मणांच्या जांचाची कांहीं क्षिती वाटली नाहीं. पण निवृत्तीला आठवें वर्ष लागल्याबरोबर विठ्ठलपंतांना त्याच्या मुंजीची काळजी पडली. ह्या काळजीतून पार पडण्यासाठीं आपण त्र्यंबकेश्वरी पुनरश्चरण करावें अशी रखुमाबाईनीं इच्छा दर्शविली. वाटेवरच विठ्ठलपंत सर्व मंडळीसह आपल्या वडिलांचे गुरू गहिनीनाथ ह्यांच्या दर्शनास गेली. गहिनीनाथांनी विठ्ठलपंतास पुरश्चरण संपल्यानंतर निवृत्तीला माझ्याजवळ अनुग्रहास ठेऊन जा असें सांगितलें. त्याप्रमाणें ते परत येत असतां दुरून त्यांनीं एक वाघ पाहिला. त्याबरोबर विठ्ठलपंतांनीं निवृत्तीला गहिनीनाथांच्या गुहेजवळ पोंचवून ते घाईघाईनें बाकी सर्व मंडळीस घेऊन घरी आले. आळंदीस आल्यावर पुन्हा ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई ह्यांनीं शेतकरी, धनगर, माळी ह्या आपल्या मऱ्हाठामंडळांत खेळून बागडून गप्पागोष्टी करून प्रसंगाविशेषी तेवढ्या लहान वयांत हितोपदेशाच्या गोष्टी सांगण्याचा आपला क्रम सुरू केला. त्या मराठा मंडळीचा प्रेमळ निष्कपटपणा, सरळभाव, श्रद्धा ह्यांचा ज्ञानेश्वराच्या मनावर अत्यंत परिणाम झाला. देवाची भक्ति ह्या मंडळींतच उत्कट आहे, सर्वांभूती देव आहे हा भाव ह्यांच्यांतच भक्तीच्या द्वारे श्रद्धेच्या जोरावर वाढविता येण्यासारखा आहे, ह्या गोष्टी ज्ञानेश्वरांच्या चटकन लक्षांत आल्या. ह्या लोकांची सेवा हीच खरी देवसेवा हा प्रकाश त्यांच्या मनांत फांकला ती मुलें वाढत्या प्रेमानें ह्या कुळंब्याच्या समाजांत वाढूं लागली. केव्हां केव्हां ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई जेवण्यास बसली असताच त्यांच्या बालमित्रांनीं त्यांना रस्त्यांतून हांका माराव्या. ती प्रेमाची हांक ऐकतांच तसेच जेवण अर्धे

टाकून त्यांनीं धांवत त्या मुलांच्या मागें जावें. केव्हां त्यांच्या घरीं ——— यांनीं दिलेल्या लाह्या गुळखोबरें ह्यावर मिटक्या देत ताव मारावा. केव्हां केव्हां त्या छोटे-खानी बालसेनेनें एकद्या वारकऱ्याची पताका घेऊन 'सांवळ्या विठोबा रखुमाई' ह्या नामघोषांत नाचत उडत भजन करावें. निवृत्तीनाथ गहिनीनाथांचा अनुग्रह घेऊन परत आले. त्यांनीं लगेच ज्ञानेश्वरांना उपदेश दिला. चार भावंडानी जग जिंकलें, जगानें चार भावंडाना आपलेसे करून टाकलें. पण इकडे विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांची चिंता कांहीं दूर होईना. पूर्व-संस्काराच्या भावना अत्यंत प्रबळ असतात. आपल्या मुलांच्या मुंजी कशा होतील ह्याची त्यांच्या मनाला एकसारखी हुरहुर लागली.




## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७—०—० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४—०—० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ—स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०—२—० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०—०—० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०—३—० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, | ,, | १०—०—० |
| (७) | श्रीसाई—लीलामृत | | ,, | ,, | २—०—० |
| (८) | श्री साई—सुमनांजली | | ,, | ,, | ०—१—० |
| (९) | कीर्तन—पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | | ,, | ,, | १—८—० |
| (१०) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा—अवतार व कार्य | | ,, | ,, | २—०—० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ,, | ०—२—० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | | ,, | ,, | ४—८—० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील :—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट—शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबइ १.

# तूं साई आमुची माई

( चाल—लावणी )

तूं पूर्ण ब्रह्म सुखधाम जगत्‌—सोयरा ।
गुरुराया हो, या सोडविं भवसागरा ।। धृ० ।।

गमविलें वृथा मी आयु अतां उमगलें ।
गुरुराया हो, तीं तारक तव पाउलें ।।

तूं साई आमुची माई आम्हि लेकरें ।
गुरुराया हो, मग दूर धरिसि कां बरें ।।

किति प्रपंच खटपट करूं हांव किति धरूं ।
गुरुराया हो, कां सांग अशामधिं मरूं ।।

मी हीन दीन अज्ञान सत्य ना कळे ।
गुरुराया हो, मन विषयीं रमलें खुळें ।।

म्हणिं कृतार्थ मजला करी रोष ना धरी ।
गुरुराया हो, मी पापी परि उद्धरी ।।

भडकल्या अग्नि ये मरण तृणाला जसें ।
गुरुराया हो, मम दोष जळावे तसे ।।

हुंदाडि वासरूं कास पयास्तव जरी ।
गुरुराया हो, कां गाय रुसे त्यावरी ।।

गणुदास बसुन हा दूर जोडितो करा ।
गुरुराया हो, या हरण करावें दरा ।।

—श्रीदासगणू महाराज

# गुरु आणि गुरुकृपा यांविषयीं

# श्री साईबाबांची शिकवण

### ना. वा. गुणाजी

**‘ सद्गुरुवीण ब्रह्मज्ञान ।**
**सर्वथा नव्हे, नव्हे जाण ’ ॥**

एकनाथी भागवत अ. १०–१०७.

**गुरूची आवश्यकता**—आम्हां आर्यांची अशी समजूत होती कीं, आणि आतांहि बहुतेकांची आहे कीं, कोणालाहि गुरुशिवाय आत्मज्ञान प्राप्त होणार नाहीं. साध्या व्यावहारिक शिक्षणामध्यें किंवा व्यवसायामध्यें, कोणी तरी शिक्षक अगर वाटाड्या लागतोच, हा आमचा नित्याचा अनुभव आहे. तेव्हां आध्यात्मिक किंवा पारमार्थिक ज्ञान संपादण्याचे कामीं गुरूची अत्यंत आवश्यकता आहे हें काय सांगावयास पाहिजे ! केवढाहि मोठा इसम का असेना किंवा प्रत्यक्ष ईश्वराचा अवतार का असेना त्यालाहि गुरुशिवाय तरणोपाय नाहीं असा जवळ जवळ सिद्धांतच आम्हीं मानीत आलों आहोंत, तरी कधीं कधीं गुरुची आवश्यकता आहे काय असा प्रश्न केव्हां केव्हां उत्पन्न होत असतो. याचें एक उदाहरण खालीं देत आहोंत.

**श्री. अण्णासाहेब दाभोळकर** ( हेमाडपंत ) भक्तश्रेष्ठ काकासाहेब दीक्षित यांनी श्री. दाभोळकरांना त्यांनीं श्री साईबाबांचें दर्शन घ्यावें असें पत्र लिहून आणि प्रत्यक्ष भेटींतहि आग्रह केला तेव्हां ते म्हणाले, मी दर्शनास जाईन पण गुरूचा उपयोग काय तें मला कळत नाहीं. पुढें, भक्तावतंस नानासाहेब चांदोरकर यांच्या आग्रहामुळें श्री. दाभोळकर शिर्डीस गेले. तेथें गेल्यावर श्री बाबांच्या दर्शनापूर्वी त्यांचा आणि बाळासाहेब भाटयांचा मोठा कडाक्याचा वाद जुंपला. वादाचा मुख्य विषय ‘ गुरूची आवश्यकता ’ हा होता. श्री. दाभोळकरांचें म्हणणें थोडक्यांत असें होतें कीं, आपली स्वतंत्रता सोडून आपण परतंत्र कां व्हावें, आपण निजकर्तव्यांत दक्ष असलों तर गुरु कशास हवा, ज्याचें त्यानेंच सर्व कांहीं केलें पाहिजे न करी त्यास गुरु काय देणार, जो करील त्याचेंच सर्व आहे. आळशापरी बसून राहील तर कसें होईल ? ज्याचा उद्धार त्यानेंच केला पाहिजे. बाळासाहेब भाटे यांचें म्हणणें असें होतें कीं, होणार तें टळणार नाहीं, मी मी म्हणणारे भागून गेले, दैवापुढें कोण काय करणार, एक करावयाला जावें तों दुसरेंच होतें, तुमची चतुराई बाजुस ठेवा, अभिमानाचा कांहीं